



# प्रीतिसंगम

www.pritisangam.com

सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर

वर्ष २८ वे | अंक १९१ | पाने ६ | बुधवार | दि.१३ नोव्हेंबर २०२४ | किंमत २ रूपये | R.N.I.No.MAHMAR./2001/10338 पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 | फोन-२२७७२५





# सह्याद्रीचा वाघ दिमाखाने विधानसभेत गेला पाहिजे

## खा.अमोल कोल्हे:बाळासाहेबांच्या विजयाची औपचारिकता बाकी

**पुसेसावळी/प्रतिनिधीः-**

गेल्या दोन-अडीच वर्षात महाराष्ट्राच्या राजकारणाची थट्टा करण्यात आली आहे. राज्यातील संस्कृतीचा चिखल करण्यात आला असून. सुसंस्कृत म्हटल्या जाणाऱ्या महाराष्ट्राच्या राजकारणाला उज्वल परंपरा होती. या परंपरेला काळीमा फासण्यात आला, याविषयी स्वाभिमानी आणि प्रत्येक मराठी माणसाच्या मनात राग असून राज्यात महाविकास आघाडीचेच सरकार येणार असल्याचा दावा करत. बाळासाहेब पाटलांची निवडणूक ही केवळ औपचारिकता आहे. महाविकास आघाडीत सर्वाधिक मताधिक्याने निवडून येणाऱ्यापैकी कराड-उत्तर मतदार संघ ही हक्काची जागा आहे. सह्याद्रीचा वाघ त्याच दिमाखाने विधानसभेत गेला पाहिजे. ही निवडणूक आमदारकीचे नसून महाराष्ट्र धर्माची निवडणूक आहे. जीवनावश्यक वस्तू विकत घेता येतात हे सर्वांना माहीत आहे परंतु आमदार विकत घेता येतात हे कमळ वाल्यांनी दाखवले आहे, असे उद्गार खा.डॉ.अमोल कोल्हे यांनी व्यक्त केले.



पुसेसावळी: जाहीर प्रचार सभेत मार्गदर्शन करताना खा.अमोल कोल्हे,त्यावेळी आ.बाळासाहेब पाटील आदी.

पुसेसावळी ता.खटाव येथे महाविकास आघाडीचे उमेदवार आ.बाळासाहेब पाटील यांच्या प्रचारसभेत ते बोलत होते.यावेळी आ.बाळासाहेब पाटील,सुनिल माने,देवराज पाटील,जशराज पाटील,संगीता साळुंखे, भाग्यश्री भाग्यवंत,मानसिंग जगदाळे,जितेंद्र पवार,चंद्रकांत पाटील,संतोष वेताळ,संतोष घार्गे,सुरेशबापु पाटील,सुहास पिसाळ, दिग्विजय पिसाळ,सौरभ पाटील, सी.एम.पाटील,दत्तात्रय रुद्रुके उपस्थित होते.

खा.कोल्हे म्हणाले दोन मराठी माणसांनी निर्माण केलेले पक्ष फोडण्यात आले,शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना विकासासाठी फोडण्यात आली असंच सांगण्यात येतं हे सर्व विकासासाठी असेल तर इथल्या सोयाबीनला चांगले भाव मिळालेत का ? शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट झालं का ? तरुणांना रोजगार मिळाला का ? कायदा आणि सुव्यवस्था सुरळीत झाली का ? यातलं प्रत्येक उत्तर हे नकारार्थी आहे. दोन पक्ष फोडून महाराष्ट्राच्या राजकारणाला कलंक लावून ते सत्तेत जाऊन बसले. ते महाराष्ट्रासाठी नव्हे तर फक्त स्वार्थासाठी जाऊन बसलेत. स्वार्थासाठी सत्तेत जाऊन बसलेल्यांना आता खाली खेचण्याची वेळ आहे, अशा शब्दात खासदार कोल्हे यांनी हल्लाबोल करुन आ.बाळासाहेब पाटील यांना कराड उत्तरच्या सर्वांगीण विकासासाठी निवडुन देण्याचे आवाहन केले.

आ.बाळासाहेब पाटील म्हणाले पुसेसावळी सह दुष्काळी भागाला उरमोडी चे पाणी मिळावे यासाठी स्वर्गीय अभयसिंहराजे भोसले,भाऊसाहेब गुदगे यांचे मोलाचे योगदान असुन यापुढील काळात पाणीप्रश्न सोडविण्यासाठी कटिबध्द आहे,शरद पवार साहेबांनी

सहकार व पणन विभागाची जबाबदारी दिली परंतु कोरोना काळात काम करताना अडचण आली पण नंतरच्या काळात मतदारसंघात सर्वांना समान न्याय या भावनेने सर्व विभागात विकासकामे केली,कराड उत्तर मतदारसंघ यशवंतराव चव्हाण साहेबांच्या विचारांचा मतदारसंघ असुन यापुढील काळातही यशवंत विचार जोपासुन मतदारसंघाच्या विकासासाठी संधी देण्याची विनंती केली.

यावेळी अविनाश घार्गे,पिंटु घार्गे,साहेबराव शिंदे,रविंद्र कदम,अशोक कदम,संग्राम पाटील,जितेंद्र घार्गे, मयुर रुद्रुके,विक्रम पवार,किरण कदम,सोहम शिंदे यांसह विविध गावचे सरपंच,ग्रामपंचायत सदस्य, सोसायटी पदाधिकारी, महाविकास आघाडी पदाधिकारी, नागरिक,महिला बहुसंख्येने उपस्थित होते.प्रास्ताविक दत्तात्रय रुद्रुके तर आभार संतोष घार्गे यांनी मानले.




### गळफास घेऊन एकाची आत्महत्या

**सातारा/प्रतिनिधीः-**

गळफास घेऊन एकाने आत्महत्या केल्याची नोंद सातारा तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. ११ रोजी संध्याकाळी साडेसहा वाजण्याच्या पूर्वी सुरज शशिकांत साबळे रा. शिवथर,ता. सातारा याने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली आहे.


उंडाळे येथे गॅस सिलेंटरचा स्फोट झाला यावेळी पहिल्या छायाचित्रात अर्धा सिलेंडर शेतात पडल्याचे दिसत आहे. तर दुसऱ्या छायाचित्रात घराचे झालेले नुकसान

# उंडाळे येथे गॅस सिलेंडरचा स्फोट;एक ठार

## स्फोटाने खोलीचा पत्रा उडाला:घराचे मोठे नुकसान

**कराड/प्रतिनिधीः-**

घरगुती गॅस सिलेंडरचा स्फोट होऊन चौदा वर्षीय मुलगा जागीच ठार झाला. उंडाळे ता.कराड येथे गावाच्या पश्चिमेस असलेल्या वस्तीवर सकाळी अकरा वाजता ही घटना घडली. या घटनेतील मयत हा उत्तर प्रदेश येथील आईस्क्रीम व्यवसायिक आहे.

अंकेन श्रीगोविंद सिंग (वय १४) मुळ गाव समायनर ता. बिदोया, जि. औरय्या उत्तर प्रदेश. सध्या रा. उंडाळे असे ठार झालेल्या मुलाचे नाव आहे. अंकेन हा सकाळी केस कापून आल्यानंतर आंघोळीसाठी ते जेथे राहतात त्या घरासमोर दारात उभा होता. याशिवाय शेजारी दोन महिला आपली नियमित कामे उरकण्यात दंग होत्या. अचानकपणे सकाळी अकरा वाजता या खोलीतील सिलेंडरचा स्फोट झाला. या स्फोटाने परिसर दणाणून गेला. पण स्फोट झालेली जागा मानवी वस्ती पासून बाजूला असल्यामुळे नेमका स्फोट कुठे झाला याची माहिती उपलब्ध झाली नाही. काही वेळात स्फोट झालेली घटना गावभर वाऱ्यासारखी पसरली.

स्फोट झालेल्या खोलीच्या बाजूचा पत्रा स्फोटाने शेजारच्या भात शेतात व उसात उडून पडला. याचवेळी अंकेन जिथे आंघोळ करत होता बरोबर त्या ठिकाणी उडालेला अर्धा गॅस सिलेंडर जोरात उडून त्याच्या डोक्यात व छातीवर उडून आपटला. त्या गॅस सिलेंडरमुळे त्या मुलाच्या डोक्याच्या व छातीला मार लागून मृतदेह च्छिन विच्छिन झाला. स्फोटाने हात व मेंदू शेजारी असलेल्या फ्रिज व चौकटीवर उडाले. सिलेंडरचा अर्धा भाग स्फोट झालेल्या ठिकाणाहून १०० मीटरवर उसात पडलेला मिळून आला तर दुसरा अर्धा भाग शोधण्याचे काम सुरू होते. याशिवाय जिथे सिलेंडर ठेवला होता त्या खोलीच्या बाजूचे पत्रे शेजारच्या शेतात पडलेले होते. या स्फोटाने मोठ्या प्रमाणात हानी झाली असून दोन दुचाकी गाड्या व अन्य साहित्याचे ही नुकसान झाले आहे.

स्फोट झालेल्या ठिकाणी अन्य मजूर राहतात परंतु हे मजूर शेतकामासाठी बाहेर गेल्याने नेमके काही घडले हे येथे राहणाऱ्या शेजाऱ्यांना समजू शकले नाही. घटना घडताच उंडाळे पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक सतीश जाधव व हवालदार माने तातडीने घटनास्थळी दाखल झाले.

# उद्धव ठाकरेंची औसामध्ये पुन्हा बॅग तपासली

**लातूर/वृत्तसंस्थाः-**

विधानसभा निवडणुकीसाठी विविध पक्षाचे नेते राज्यभर प्रचार करत आहेत. रात्रंदिवस नेत्यांकडून सभांचा धडाका लावला आहे. विरोधकांकडून सत्ताधार्यांवर टीका केली जात आहे. अशातच सभेच्या ठिकाणी पोहचण्यापूर्वी यवतमाळच्या वणीमध्ये सोमवारी निवडणूक आयोगाच्या कर्मचाऱ्यांकडून उद्धव ठाकरे यांची बॅग तपासण्यात आली होती. तपासणीचा व्हिडिओ खुद्द उद्धव ठाकरे यांनी काढला होता. दरम्यान, आता पुन्हा एकदा लातूरमधील औसा येथे निवडणूक आयोगाचे कर्मचारी बॅग तपासणी करत असल्याचा व्हिडिओ उद्धव ठाकरे यांनी काढला.

भाजपा नेत्यांना का रोखलं जात नाही? : संपूर्ण 'तडजोड आयोग' निर्लज्जपणे उद्धव ठाकरेंना त्यांच्या सभेत जाण्यास उशीर करण्याचा प्रयत्न करत आहे. प्रश्न असा आहे की, भाजपाच्या लुटीला प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र दौऱ्यावर आलेले पंतप्रधान किंवा इतर मंत्री अशा प्रकारे का रोखले जात नाहीत? अशी तिखट प्रतिक्रिया औसा येथे उद्धव ठाकरे यांच्या बॅग तपासणीवरुन आदित्य ठाकरे यांनी दिली.

पंतप्रधान मोदींचीही बॅग तपासा : बॅगांची तपासणी करतानाचा व्हिडिओ उद्धव ठाकरे यांनी चित्रित करून निवडणूक आयोगाच्या कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. मीच पहिला गिऱ्हाईक आहे का? असा सवाल उद्धव ठाकरेंनी कर्मचाऱ्यांना विचारला. पंतप्रधान



मोदी सोलापुरात येत आहेत, त्यांचीही बॅग तपासा. माझी तपासणी होत असेल, तर त्यांचीही तपासणी झाली पाहिजे, अशी खोचक विनंती उद्धव ठाकरेंनी केली. बॅगा तुमच्याकडेच ठेवा. हवंतर माझ्या पुढच्या मुक्कामी या बॅगा घेऊन या, असा टोलाही ठाकरेंनी कर्मचाऱ्यांना लगावला.

### व्हॅनिटी व्हॅन..

प्रत्येक नेत्या सोबत
असते व्हॅनिटी व्हॅन
सोयीसुविधांनी युक्त
आरामदायी ते यान
नेता पावसात भिजे
लोकां वाटेअभिमान
फिरत राहे बांधावर
उन्हापावसा परेशान
पिटत राहता टाळ्यां
करत राहती सन्मान
पुढारी जातो व्हॅनमधे
तिथे सुसज्ज सामान
रे साहेबांची पदयात्रा
चालली झकास छान
सळाळता तो उत्साह
सहज बनला बेभान
व्हॅनमध्ये कॅमेरे ऑफ
रहावेलागते सावधान
बातम्या शिकार नको
ठेवावेलागते अवधान
भाग घेता आंदोलनां
काठ्यांचे कुठे ध्यान
व्हॅनमध्ये आराम करा
तलवारी करतो म्यान
पुढारी नसतात कधी
बा कसलेचं सुपर मॅन
भ्यायचे कुणा कशाला
जो सोबत व्हॅनिटीव्हॅन

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# काँग्रेसची पाकिस्तानची भाषा:पंतप्रधान

**पुणे/प्रतिनिधीः-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान संपूर्ण देशात का लागू नव्हते ते काँग्रेसने सांगावे. आता आम्ही ३७० कलम काढल्यानंतर ते परत लागू करा असा प्रस्ताव काँग्रेसने केला. मागील ७० वर्षे पाकिस्तानची जी भाषा होती तीच आता काँग्रेसची झाली आहे असा हल्ला चढवत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुण्यातील प्रचारसभेत काँग्रेसला लक्ष्य केले. यापूर्वीच्या पुण्यातील लोकसभा प्रचारसभेत ज्येष्ठ नेते शरद पवार यांना भटकती आत्मा असे म्हणणाऱ्या मोदी यांनी या सभेत मात्र पवार यांच्यावर एक शब्दही काढला नाही.

विधानसभा निवडणुकीतील पुणे व सातारा जिल्ह्यातील महायुतीच्या ३१ उमेदवारांच्या प्रचारार्थ स.प. महाविद्यालयाच्या मैदानावर मंगळवारी सायंकाळी पंतप्रधान मोदी यांची जाहीर सभा झाली. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी, उदयनराजे भोसले, माजी



केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर व महायुतीचे ३१ उमेदवार व्यासपीठावर उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांना अभिवादन करून, 'पुण्यातील लाडक्या बहिणींनो व भावांनो, माझा नमस्कार' अशी मराठीतून भाषणाला सुरूवात करत मोदी यांनी त्यानंतर मात्र काँग्रेसवर तिखट शब्दांमध्ये हल्ला चढवला.

मोदी म्हणाले, काँग्रेसने कर्नाटकमध्ये निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता केली नाही. तिथे दररोज घोटाळे समोर येत आहेत. जनतेकडून लुटलेला पैसा काँग्रेस महाराष्ट्रातील निवडणुकीत वापरत आहेत. डॉ. आंबेडकर यांचे संविधान संपूर्ण देशात का लागू केले नाही याचे उत्तर काँग्रेसने द्यावे. आम्ही देशातील १४० कोटी जनतेच्या पाठिंब्याने ३७० कलम जमिनीत गाडले. काँग्रेसने ते परत लागू करण्याचा प्रस्ताव विधानसभेत मंजूर केला आहे. ते आता पाकिस्तानची भाषा बोलत आहेत.

विदेशी गुलामगिरीची मानसिकता असलेल्या काँग्रेसने महाराष्ट्राचा सातत्याने अपमान केला अशी टीका मोदी यांनी केली. हिंमत असेल तर त्यांनी युवराजांच्या तोंडून वीर सावरकर, बाळासाहेब ठाकरे यांची प्रशंसा करून दाखवावी असे आव्हानही त्यांनी दिले. सत्तेकरता काँग्रेसने कायम तुष्टीकरणाचा खेळ खेळला. आताही ते दलित, आदिवासी मागासवर्गीय यांची एकजूट तोडण्यासाठी प्रयत्न करत आहेत. त्यांच्यापासून सावध रहायला हवे. ते तुम्हाला कमकुवत करतील व नंतर आरक्षण काढून घेतील. एक रहेंगे तो सेफ रहेंगे अशी घोषणाही मोदी यांनी दिली.

महायुती आहे तरच राज्याची गती व प्रगती आहे. राज्यात अनेक ठिकाणी फिरलो, सगळीकडे जनतेचा पाठिंबा मिळत आहे. पुण्यात येतानाही लोक रस्त्यावर उभे राहून अभिवादन करत होते. आगामी काळात महायुती सरकार राज्यात वेगाने विकासकामे करेल. पुण्यालाही त्याचा चांगला फायदा होईल. देशातील नागरिकांच्या आकांक्षा हाच आमच्या कामाचा आधार आहे. महायुतीच्या आधीच्या सरकारकडे सांगण्यासारखे काहीच नाही, त्यामुळे ते त्यावर बोलू शकत नाही असे मोदी म्हणाले.

जम्मू कश्मिरसाठीचे आम्ही रद्द केलेले कलम पुन्हा रागू करण्याचा प्रस्ताव करणाऱ्या काँग्रेसला दिवा दाखवण्याची गरज आहे असे म्हणत मोदी यांना श्रोत्यांना मोबाईलची लाईट लावण्याचे आवाहन केले. श्रोत्यांनी त्याप्रमाणे मोबाईलची बॅटरी सुरू करताच संपूर्ण मैदान उजळून निघाले. मोदी यांनी ३६ मिनिटे भाषण केले. संपूर्ण भाषणात त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर एका शब्दाचीही टीका केली नाही. त्याची चर्चा लगेचच सभास्थळी सुरू झाली.

# संविधान वाचविण्याची ही लढाई

**भंडारा/वृत्तसंस्थाः-**

संविधानात प्रत्येक धर्माचा आदर आहे. समानता आहे. परंतु, आरएसएस आणि नरेंद्र मोदी संविधानावर आक्रमण करून संविधानाची हत्या करू पाहात आहेत. ते समोरून बोलत नाहीत. जनता तुटून पडेल म्हणून ते बंद दाराआड हे कारस्थान रचत आहेत. त्यांचे कारस्थान हाणून पाडण्याची, संविधान वाचविण्याची ही लढाई आहे, असे प्रतिपादन काँग्रेसचे नेते खासदार राहुल गांधी यांनी केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संविधानाचे वाचन केले असते, तर संविधानाचा आदर केला असता. मात्र त्यांनी संविधानाचे वाचन केलेच नाही, असा आरोपही राहुल गांधी यांनी केला.

गोंदिया येथील सर्कस ग्राउंड येथे महाविकास आघाडीच्या



उमेदवारांच्या प्रचारार्थ मंगळवारी (ता. १२) राहुल गांधी यांची जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. दुपारी दीड वाजता होणारी ही सभा सायंकाळी सव्वाचारला सुरू झाली. 'आपका मुड कैसा है' या वाक्याने राहुल गांधी यांनी भाषणाला सुरुवात केली. सुरुवातीलाच संविधान बदलाची भाषा वापरणाऱ्या आरएसएस आणि नरेंद्र मोदी यांचा चांगलाच समाचार घेतला.

ते म्हणाले, आमदारांना कोट्यवधी रुपये देऊन महाराष्ट्रातील सरकार पाडली. गेल्या दहा वर्षांत एकाही शेतकऱ्याचे कर्ज या सरकारने माफ केले नाही. उलट अदानी, अंबानी यांचे १६ लाख कोटी रुपयांचे कर्ज माफ केले. हे सरकार शेतकरी हिताची नाही, तर करोडपतींच्या हिताची आहे. महाराष्ट्राच्या वाट्याला येणारे उद्योग, प्रकल्प दुसऱ्या राज्यात हलविण्याचे काम नरेंद्र मोदींनी केले. शेतकऱ्यांबाबत तीन काळे कायदे या सरकारने केले. हे कायदे शेतकऱ्यांचे फायद्याचे आहेत, असे नरेंद्र मोदी सांगत होते. मग शेकडो शेतकरी रस्त्यावर का उतरले? असा प्रश्न उपस्थित करीत राहुल गांधी यांनी सरकारने शेतकऱ्यांसाठी काहीच केले नाही, असा आरोप केला. यावेळी मंचावर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, खा. प्रशांत पडोळे, महाविकास आघाडीचे उमेदवार व नेते उपस्थित होते.

# शशिकांत शिंदेंना शालिनीताई पाटलांचा पाठिंबा

**कोरेगाव/प्रतिनिधीः-**

कोरेगाव विधानसभा मतदारसंघामधील शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार शशिकांत पाटील यांची ताकद वाढली असून माजी आमदार शालिनीताई पाटील यांनी त्यांना जाहीर पाठिंबा दिल्याची घोषणा केली. जरंडेश्वर कारखाना परिसरातील सर्व मतदार हे शशिकांत शिंदे यांच्या पाठीशी राहतील असं शालिनीताई पाटील यांनी जाहीर केलं. शशिकांत शिंदे यांच्या विरोधात



शिंदे गटाचे आमदार महेश शिंदे हे निवडणूक लढवत आहेत. शालिनीताई पाटील म्हणाल्या की, विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून कोरेगाव मतदारसंघातून शशिकांत शिंदे विधानसभेसाठी उभे आहेत. पाच वर्षांपूर्वी निवडून आलेले आमदार महेश शिंदे यांना उद्धव ठाकरे यांनी तिकिट दिलं. परंतु ज्या एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंचा पक्ष फोडला त्याच पक्षात महेश शिंदे गेले. हे अत्यंत विश्वासघाती आमदार आहेत.

आपले विचार वाळूत लिहा, क्षमेचे वारे त्यांना उडवून लावेल. आपले सुख दगडात कोरा, ते कोणीही खोडू शकणार नाही.

## संपादकीय

# मतदान प्रक्रियेबाबत अपेक्षा

निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि सुलभरीत्या पार पाडण्यास निवडणूक आयोगाचे प्राधान्य आहे. त्यादृष्टीने निवडणूक यंत्रणेमार्फत सर्व आवश्यक खबरदारी घेतल्या जात असते. निवडणूक प्रक्रियेमध्ये राजकीय पक्षांचा सहभाग खूप महत्त्वाचा असतो. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेत वेगवेगळ्या टप्प्यावर निवडणूक यंत्रणेकडून होणाऱ्या तयारीमध्ये राजकीय पक्षांचे उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी यांना सहभागी करून घेतले जाते. मतदार याद्यांच्या संक्षिप्त पुनरिक्षणाची प्रक्रिया आपल्या राज्यामध्ये पार पाडण्यात आली. यामध्ये राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यांनी त्या-त्या केंद्रांच्या मतदान क्षेत्रासाठी नेमलेल्या बूथ लेवल ऑफिसर यांना मदत करण्याची तरतूद आहे. त्यांच्यामार्फत बूथ लेव्हल ऑफिसर यांच्या कामकाजावर त्याचबरोबर मतदार यादीतील वगळण्यात येणारी नावे व नवीन मतदार नोंदणी झालेली नावे यावर राजकीय पक्षांचे लक्ष राहते. जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्यामार्फत राजकीय पक्षांचे स्थानिक प्रतिनिधी यांच्यासमवेत बैठका आयोजित करून माहिती दिली जाते. या सर्व बैठकांचे इतिवृत्त लिहिले जाते आणि जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्याकडे जतन केले जाते. राष्ट्रीय आणि राज्यस्तरावरील मान्यता प्राप्त राजकीय पक्षांचे स्थानिक प्रतिनिधी यांच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत बैठका घेतल्या जातात. सभेची सूचना राजकीय पक्षांच्या अधिकृत ईमेल आयडीवर त्यांना पाठविली जाते. या बैठकींना राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित राहून शंका आणि अडचणी मांडतात. मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत शंकांचे निरसन केले जाते. तसेच आवश्यकता भासल्यास भारत निवडणूक आयोगाकडे मार्गदर्शनासाठी पाठविले जाते. मतदान यंत्राबाबत प्रक्रियेमध्ये राजकीय पक्षांचा वेळोवेळी सहभाग आवश्यक आहे, तशा निवडणूक आयोगाच्या स्पष्ट सूचना आहेत. मतदान यंत्र ठेवलेले गोडावून उघडण्याच्या वेळेस आणि बंद करण्याच्या वेळेस राजकीय पक्षांचे स्थानिक प्रतिनिधी यांना आमंत्रित केले जाते. ईव्हीएम मशिन्स त्यांच्या समक्ष उघडून सीलबंद करण्याची कार्यवाही केली जाते. या कार्यवाहीच्या वेळी जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्यामार्फत व्हिडिओ शूटिंगदेखील केली जाते. आचारसंहिता जाहीर होण्यापूर्वी निवडणुकीची तयारी म्हणून जिल्हास्तरावर ईव्हीएम मशिन्स उपलब्ध झाल्यानंतर कंट्रोल युनिट, ततझअढ आणि बॅलेट युनिट यांची संख्या निश्चित करून निवडणुकीसाठी किती मशिन्स आवश्यक आहेत तेवढ्या प्रमाणात उपलब्धता निश्चित केली आते. ऋळींीं डर्शींशश्र उश्रशलज्ञ म्हणजे प्रत्येक मशीनची तपासणी करून ते चालू अवस्थेत आहे की नाही, त्यामध्ये बिघाड आहे काय, त्यांची सर्व बटने व्यवस्थित काम करत आहेत किंवा कसे? यांची तपासणी केली जाते. ही तपासणी भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड या केंद्र शासनाच्या संस्थेचे अभियंते करत असतात. या तपासणीच्या वेळेस जिल्हा पातळीवर राजकीय पक्षांचे स्थानिक प्रतिनिधी यांना निमंत्रित केले जाते. त्यांच्या समक्ष तपासणीची कार्यवाही पूर्ण करून मॉकपोल ही प्रक्रिया राबविण्याकरिता राजकीय पक्षांचे प्रतिनिधी सहभागी होतात. त्यावर अल्फा, बिटा अशा चिन्हांचा उपयोग करून एका चिन्हाचे बटन दाबले तर दुसऱ्या चिन्हाची प्रिंट स्लिप निघत नाही याबाबत तपासणी करून स्थानिक राजकीय प्रतिनिधींची खात्री झाल्यावर ते मशीन प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेसाठी तयार ठेवले जाते. मॉकपोल झाल्यावर राजकीय पक्षांसमक्ष सर्व मशिन्स गोडावूनमध्ये सीलबंद ठेवली जातात. महाराष्ट्र राज्यामध्ये फस्ट लेव्हल चेक प्रक्रिया दि. १ ऑगस्टपासून राबविण्यात आली असून, मशिन्स सीलबंद करून ठेवण्यात आलेल्या आहेत. प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यांच्याशी चर्चा करून त्यांच्या उपस्थितीत प्रक्रिया पूर्ण केली जाते. या प्रक्रियेचे व्हिडिओ शूटिंग करून जतन करून ठेवण्यात आलेले आहे. महाराष्ट्र राज्यात राजकीय पक्षांनी स्थानिक प्रतिनिधींमार्फत ऋडउ प्रक्रियेत सहभाग नोंदविला आहे. ऋडउ जघ असे स्टिकर लावलेल्या मशिन्सच्या गोडावूनमधील एकूण मतदान केंद्र संख्येच्या ५% मशिन्स प्रशिक्षण आणि जनजागृतीसाठी वापरण्यात आल्या आहेत. जनजागृती कामासाठी ९ सप्टेंबर ते ९ ऑक्टोबर असा कालावधी होता. त्यानंतर मतदान अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणामध्ये मतदान प्रक्रिया प्रात्यक्षिक करण्यासाठी त्याच मशिन्स उपयोगात आणल्या जात आहेत. या मशिन्स प्रत्यक्ष निवडणुकीकरिता वापरल्या जाणार नाहीत. त्यानंतर कमिशनिंग प्रक्रियेवेळी मशिन्सची सिंबॉल लोडींग ही प्रक्रिया केली जाते. यासाठी दि. १० नोव्हेंबरपासून वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे आणि अशाप्रकारे कमिशनिंग पुढील ४ ते ५ दिवसांत पूर्ण होईल. या संपूर्ण प्रक्रियेसाठी राजकीय पक्षांचे स्थानिक प्रतिनिधींना निमंत्रित करून त्यांच्या समक्ष कमिशनिंग केले जाते. मॉकपोलमुळे तयार होणाऱ्या ततझअढ च्या तींशी ीश्रळींी एकत्रित करून त्याची विल्हेवाट लावली जाते. स्थानिक राजकीय पक्षांचे प्रतिनिधी समक्ष मतदानासाठी सिद्ध असलेली सर्व मशिन्स कडेकोट बंदोबस्तात गोडावूनमध्ये ठेवले जातात. मतदान अधिकाऱ्यांच्या यादीचे निवडणूक आयोगाच्या परराज्यातील निरीक्षकांच्या उपस्थितीमध्ये ीरपवोळीरींप केले जाते. त्यामुळे कोणत्या कर्मचाऱ्यास कोणत्या मतदान केंद्रावर निवडणुकीच्या कामासाठी जावे लागणार हे मतदान केंद्रावर जाण्यास पथके निघतात तेव्हाच कळते. त्याचप्रमाणे मतदान केंद्रासाठी कंट्रोल युनिट, ततझअढ, बॅलेट युनिट यांचे ीरपवोळीरींप होते आणि कोणत्या मतदान केंद्रावर कोणकोणत्या कर्मचाऱ्याजवळ कोणते मशिन्स जाणार यांचे संगणकाद्वारे वाटप होते. ही प्रक्रिया राजकीय पक्षांचे स्थानिक प्रतिनिधींसमोर केली जाते व त्याबाबतचे इतिवृत्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या स्वाक्षरीसह जतन केली जाते. कोणत्या नंबरचे कोणते मशीन कोणत्या मतदान केंद्रावर जाणार त्याची यादी उमेदवारांना दिली जाते. मतदान यंत्र संच घेऊन मतदान पथक मतदान केंद्रावर जायला निघतात तेव्हा राजकीय पक्षांच्या स्थानिक प्रतिनिधींसमोर गोडावून उघडले जाते आणि ीरपवोळीरींप नुसार तिन्ही मशिन्स मतदान अधिकाऱ्यांच्या पथकाकडे सुपूर्द केली जातात. प्रत्यक्ष मतदान सुरू होण्याच्या आधी मतदान केंद्रावर उमेदवार किंवा उमेदवाराचे मतदान प्रतिनिधी यांच्यासमोर मॉकपोल घेतला जातो. मशिन्स व्यवस्थित चालू आहेत की नाही याची खात्री मतदान प्रतिनिधी यांना पटल्यावर प्रत्यक्ष मतदानाला सुरुवात केली जाते. मतदानाच्या संपूर्ण प्रक्रियेमध्ये मतदानाच्या गोपनीयतेचा भाग वगळून मतदान अधिकारी यांची सर्व कामे प्रत्येक मतदान केंद्रात उमेदवाराच्या प्रतिनिधींसमक्ष घडतात. मतदान संपल्यावर तिन्ही मशीनचा तपशील मतदान प्रतिनिधींसमक्ष तपासला जातो व मशिन्स सीलबंद केली जातात. मतदान यंत्रांच्या वाहतुकीदरम्यान उमेदवार आणि त्यांचे प्रतिनिधी वाहनाचे सिलिंग स्वत: पाहू शकतात. सिलिंग करणे अथवा उघडणे या प्रक्रियेदरम्यान व्हिडिओ शूटिंग देखील केली जाते. मतदानाच्या वेळेस देखील मशिन्स उघडणे व बंद करतेवेळेस उमेदवाराचे स्थानिक प्रतिनिधी उपस्थित असतात. त्यांच्या उपस्थितीबाबत मतदान यंत्रावरील लावण्यात येणाऱ्या स्लीपवर ते स्वाक्षरी करू शकतात. मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे आणि जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या पातळीवर उमेदवार आणि राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यांच्याशी बैठका वेळोवेळी घेण्यात येतात. सदर बैठकीमध्ये निवडणूक प्रक्रियेसंबंधी माहिती दिली जाते. आपल्या महाराष्ट्र राज्याला शांततापूर्ण निवडणूक आणि मतदान प्रक्रियेची सवय आहे. सर्व राजकीय पक्ष आणि उमेदवार आणि संबंधित सर्व घटकांचा सहभाग याबाबत प्रत्येक टप्प्यावर खबरदारी घेतली जाते. महाराष्ट्र राज्यात होणाऱ्या निवडणुकांना गौरवशाली परंपरा असल्याने सध्याची विधानसभा निवडणूक प्रक्रियादेखील शांततेने पार पडेल अशी अपेक्षा आणि खात्री आहे.

## बोधकथा

### यातना

अब्राहम लिंकन यांच्या जीवनातील कथा. एकदा ते सिनेटच्या बैठकीला निघाले होते. वाटेत त्यांनी पाहिले की, रस्त्याकडेच्या एका खड्ड्यातील चिखलात एक डुक्कर अडकले होते. त्यातून बाहेर पडण्यासाठी ते केविलवाणी धडपड करत होते. पण होत होते मात्र उलटेच. अखेर लिंकन तेथे गेले. त्यांनी त्या डुकराला चिखलातून बाहेर काढले. या प्रयत्नात त्यांच्या कपड्यांना खूपच चिखल लागला पण ते बदलण्यास वेळ लाग़ेल म्हणून अखेर ते तसेच बैठकीला गेले. कपडे खराब का? हे इतर सदस्यांनी विचारण्यापूर्वीच त्यांनी सर्व प्रकार सांगितला. सगळे सदस्य त्यांच्या भूतदयेबद्दल कौतुक करू लागले. ते थांबवत लिंकन म्हणाले, 'तुमचा काहीतरी गैरसमज होतोय. त्या डुकरावर दया दाखवण्यासाठी मी हे सारं केलेलंच नाही. त्याची केविलवाणी धडपड मला पाहवेना. माझ्या मनाला खूप यातना होऊ लागल्या. माझ्या हृदयातील कालवाकालव दूर व्हावी म्हणून मी हे सारं केलं. यात मदत झाली असेल तर ती मलाच झाली आहे.'

कथा उपदेश : दुसऱ्याच्या यातना कमी केल्याने मनाला समाधान लाभते.

# इतर वेळेच्या फटाके बाजीवर देखील बंदी घाला

फटाके आणि दिवाळी हे समीकरणच आहे. दरवर्षी दिवाळीत मोठ्या प्रमाणात फटाके वाजवले जातात त्यामुळे वायू प्रदुषण तर होतेच पण त्यासोबतच ध्वनी प्रदुषण देखील होते. फटाक्यांचे केवळ इतकेच दुष्परिणाम आहेत असे नाही तर याशिवायही अनेक दुष्परिणाम फटाक्यांमुळे होतात म्हणूनच दरवर्षी दिवाळी आली की शासकीय यंत्रणा, सामाजिक व सेवाभावी संस्था तसेच पर्यावरणवादी संघटना नागरिकांना दिवाळीत जास्त फटाके वाजवू नका असे आव्हान करतात. फटाकेमुक्त दिवाळी साजरी साजरी व्हावी यासाठी विविध उपक्रम राबवले जातात. शाळा, कॉलेजमधून त्याबाबत जनजागृती केली जाते. फटाक्यांचे दुष्परिणाम समजावून सांगितले जातात आणि ते योग्यही आहे, त्याची गरजही आहे. फटाकेमुक्त दिवाळी साजरी करणे ही काळाचीच गरज आहे. फटाक्यांमुळे अनेक दुष्परिणाम होतात. सरकारी यंत्रणा, सामाजिक व सेवाभावी संस्था तसेच पर्यावरणवादी संघटनांच्या आव्हानांना आणि प्रयत्नांना बऱ्यापैकी यश ही मिळत आहे. यावर्षी दिवाळीत फटाके वाजले मात्र मागील वर्षीच्या तुलनेत त्याचे प्रमाण कमी होते. फटक्यांबाबत नागरिकांची जनजागृती होतेय ही



**श्याम ठाणेदार**
**पुणे**

अतिशय चांगली गोष्ट आहे. फटाक्यांच्या दुष्परिणामाबाबत नागरिक जागरूक होत आहे ही स्वागतार्ह बाब आहे याबाबत सरकारी यंत्रणा, सामाजिक व सेवाभावी संस्था तसेच पर्यावरणवादी संघटनांचे अभिनंदनच करायला हवे तसेच नागरिकांचेही आभार मानावे लागेल. नागरिकांनी दिवाळीत फटक्यांबाबात जी जागरूकता दाखवली ती इतर वेळेसही दाखवायला हवी. कारण आपल्या देशात केवळ दिवाळीतच फटाके वाजवले जातात असे नाही तर वर्षभर कोणत्या ना कोणत्या कारणांनी फटाके वाजवले जातात मग तो सण उत्सव असो की आनंदाचं प्रसंग. फटाके वाजवूनच सण - उत्सव, आनंदाचे क्षण साजरे करण्याची प्रथाच पडली आहे. काही लोक नवीन वर्षाचे स्वागत फटाक्यांच्या आतषबाजीने करतात. ३१ डिसेंबरच्या मध्यरात्री कानठळ्या बसतील इतकी फटाके वाजवली जातात. थर्टी फर्स्ट साजरा करताना उन्माद दाखवण्याच्या खटाटोपात नागरिक फटकेबाजी करतात. नाताळच्या रात्रीही फटाके वाजवले जातात. ईदच्या दिवशी चांद दिसला की फटाके वाजवली जातात.




वाढदिवस साजरा करताना फटाके वाजवण्याचे फॅड हल्ली सुरू झाले आहे. लग्नातही फटाक्यांची आतषबाजी पाहायला मिळते. दिवाळीत फटाके वाजवू नका असे आव्हान करणाऱ्या राजकीय नेत्यांच्या राजकीय मेळाव्यात, विजयी मिरवणुकांतही फटाक्यांची मोठ्या प्रमाणात आतषबाजी होते. दिवाळीत जास्त फटाके वाजू नयेत यासाठी प्रयत्न करणारे या इतर वेळी केल्या जाणाऱ्या फटाकेबाजीकडे मात्र सोईस्करपणे दुर्लक्ष करतात. दिवाळीच्या पाच दिवसांच्या फटाक्यांमुळे जे दुष्परिणाम होतात तेच इतर वेळेच्या फटाकेबाजीतही होतात. त्यामुळे या इतर वेळेच्या फटाक्यांच्या आतषबाजीवर देखील बंधने घातली पाहिजेत. नागरिकांनीही फटाके वाजवूनच आनंद साजरा केला पाहिजे ही मानसिकता बदलायला हवी. नागरिकांनी फटक्यांबाबत जी जागरूकता दिवाळीत दाखवली ती वर्षभर दाखवायला हवी.

# मैत्र जीवांचे अतूट बंधनाचे



कोणताही व्यक्ती रक्ताच्या नात्यांत, जवळच्या नात्यांत,दूरच्या नात्यांत आणि अतिदूरच्या नात्यांत रमतो, जीवनाचा आनंद लुटतो व सुखी जीवन जगण्याचा प्रयत्न करतो. परंतु,मानवी जीवनात आणखी एका नात्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे.हे नाते असते सर्वांचे आवडते नाते.हे नात्यापलीकडचे नाते म्हणजे मैत्रीचे नाते.मैत्रीचे नाते हे निस्वार्थी नाते,सर्वांना हवेहवेसे नाते, आपुलकीचे नाते आणि जिव्हाळ्याचे नाते असते.मैत्रीच्या नात्यांत जात, धर्म, वंश, गरिबी आणि श्रीमंती हे भेद पाहिले जात नाहीत.

मैत्रीचे नाते लवकर जुटत नाही आणि मैत्रीचे नाते एकदा जुटले की ते सहजासहजी तुटत नाही.दोन किंवा अनेक जीवलग मित्रांच्या निस्वार्थ दोस्तीची महत्ती सांगणारे अनेक हिंदी व मराठी चित्रपट निघाले आहेत. अनेक कवींनी व गीतकारांनी मैत्रीचे वर्णन करणारे गीते लिहिले आहेत.आपण ती गीते नेहमी आवडीने ऐकतो. मानवी जीवनाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर वेगवेगळे मित्र भेटतात जसे की बालपणीचे मित्र, शालेय जीवनातील मित्र, कॉलेज जीवनातील मित्र,प्रौढ जीवनातील मित्र आणि वृध्द अवस्थेतील मित्र हे सगळे मित्र हवेहवेसे वाटतात. एके दिवशी माझा एक मित्र युवराज चव्हाण याचा फोन आला आणि 'माझ्या वर एखादी केस टाक, निदान कोर्टाच्या पेशीला आपली भेट होईल'असे तो मिश्किलपणे म्हणाला.त्याचे म्हणणे मलाही पटले.

सुखदु:खात सोबत राहणारे मित्र, संकटात मदतीला चटकन धावून येणारे मित्र आणि गरजेच्या वेळी सढळ हाताने मदत करणारे मित्र जीवनाच्या परीक्षेत यशस्वी होण्यासाठी पूरेपूर मदत करत असतात.म्हणून मानवी जीवनात मैत्रीच्या नात्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

अगदी परवाच्या दिवशी मी माझ्या शाळेत नोकरी करत असताना किसन शिंदे हा माझा शालेय मित्र अचानक मला भेटायला आला.त्याला पाहून मला खूप आनंद झाला.शालेय जीवनातील इतर



**बबन गुळवे**
**उमरगा कोर्ट**

मित्रांचीही आठवण झाली. दीर्घ मध्यंतरात आम्ही मनसोक्त गप्पा मारल्या आणि एकत्र बसून आम्ही जेवण केले.यावेळी शाळेतील माझ्या सहकारी शिक्षक मित्रांनी आम्हाला जास्तीचा डबा दिला. मारोती रुद्रावाड, अंकुश आडे, विलास आगलावे, बालाजी नाईक, उत्तम घोडके आणि संजय पालकुर्तावार हे माझे शिक्षक मित्र आहेत. आम्ही शाळेत एकमेकांना समजून घेऊन राहतो, एकमेकांना शैक्षणिक कामात मदत करत असतो. कोणाला घमंड नाही की कशाचाही गर्व नाही. मी सध्या ज्या शाळेत नोकरी करत आहे त्या शाळेत माझ्या शिक्षकी पेशाला १६ वर्षे पूर्ण झाली आहेत.या काळात एकनाथ पलमटे, बळीराम काकडे, शिवराज गोरगे, कार्तिक घाटीवाले, विश्वनाथ विळेगावे, रामराव चव्हाण हे माझे शिक्षक मित्र बदली होऊन गेले तरीही आमची मैत्री कायम आहे. जळकोट जि.प.प्रशालेत पाच वर्षे सेवा बजावताना माधवराव वाघमारे, शिवदास माटोरे, अनंतराव धुळशेट्टे, रामचंद्र देमगुंडे, विश्वनाथ गंगोत्री आणि हणमंतराव कमलापुरे हे जीवाभावाचे मित्र मिळाले. यांच्या संगतीत शिक्षकी पेशाची कर्तव्ये कळाली.

शालेय जीवनातील मित्र आजही जसेच्या तसे आठवतात. प्रमोद भोगील, संभाजी गरड, संजय अर्थमवार, दिपक रणक्षेत्रे, विष्णू भंडे, बशीर शेख, रमेश कांबळे, उल्हास लोखंडे हे माझे आवडते मित्र आणि इतर आम्ही सगळे मित्र यावर्षी गेट टुगेदर साजरा करणार आहोत.आणि विशेष बाब म्हणजे शैक्षणिक कामानिमित्त मी ज्यांच्या सोबत दररोज प्रवास करतो ते माझे मित्र दत्तात्रय मोहिते, बालाजीराव केंद्रे, प्रजाल शिंदे, प्रकाश नागरगोजे हे अतिशय सुस्वभावी व चांगल्या विचारांचे मित्र आहेत. प्रवासात आम्ही फार मौजमस्ती करतो. आणि साहित्य क्षेत्राची जाणीव असणारे माझे काही मित्र आहेत. कवी शिवाजी नामपल्ले, शिवाजी वाघमारे, बालाजी तुरेवाले, प्रेमनाथ गायकवाड, राजेंद्र नरवाडे, धनंजय उजनकर हे मला नेहमी लेखन करण्यासाठी प्रोत्साहन देतात. माझ्या लेखन संपदेची वाहवा करतात.या माझ्या सगळ्या मित्रांनी मला नेहमी मैत्रीचे नाते किती श्रेष्ठ असते याची जाणीव करून दिली आहे.मित्र हे जीवाभावाचे असतात, मित्र हे निरपेक्ष भावनेने जीव लावणारे अवलिया असतात याची अनुभूती दिली आहे.

### खराडी येथील मणिपाल हॉस्पिटल मधील डॉक्टरांनी ७३ वर्षीय रुग्णाच्या लहान आतड्यात होणाऱ्या रक्तस्त्रावाला शोधण्यासाठी

# अत्याधुनिक साधन म्हणून केला कॅमेरा कॅप्सुलचा उपयोग

पुणे, नोव्हेंबर २०२४- एक ७३ वर्षीय रुग्ण मलेना, हायपोटेन्शन आणि अशक्तपणाच्या त्रासाने युक्त अशा रुग्णाला पुण्यातील खराडी येथील मणिपाल हॉस्पिटलच्या आयसीयू मध्ये दाखल करण्यात आला. त्या रुग्णाला सातत्याने होणारा त्रास म्हणजे सातत्याने होणारा मलेना (काळे आणि चिकट शौच होणे), अशक्तपणा, डोक्याला हलकेपणा जाणवणे आणि कमी रक्तदाब इत्यादींचा त्रास होत होता. पचनसंस्थेशी निगडीत पूर्वी कोणतीही समस्या नसतांना रुग्णाला हळूहळू जेवणावरील इच्छा जाणे व वजन कमी होऊ लागले.

हॉस्पिटल मध्ये दाखल केल्यानंतर नियमित रक्तचाचणीत रक्तातील हिमोग्लोबिनची पातळी (एचबी) ही ५.६ जी/डीएल, आढळली म्हणजे कुठेतरी रक्तस्त्राव होत होता. सुरुवातीच्या उपचारांनंतर हिमोग्लोबिनची पातळी ही ७.४ जी/डीएल वर पोहोचली पण नंतर लगेचच ती ढासळून ६.६ जी/डीएल वर आली, यामुळे रक्तस्त्रावाचे कारण शोधणे आवश्यक होते.

सुरुवातीच्या निदान प्रक्रियेमध्ये गॅस्ट्रोस्कोपी करण्यात येते पण वरच्या गॅस्ट्रोइंटरस्टायनल ट्रॅक्ट मध्ये कोणताही रक्तस्त्राव सापडला नाही आणि कोलोनोस्कोपी केल्यानंतर सुध्दा आतडे आणि टर्मिनल इलुनम ची चाचणी केल्यानंतर त्यातूनही रक्तस्त्रावाचे स्थान सापडू शकले नाही. त्यानंतर पोटात काही समस्या आहे का हे तपासण्यासाठी तसेच व्हस्क्युलर समस्या तपासण्यासाठी ओटीपोटाची सीटी न्जोप्लास्टी करण्यात आली तरीही कोणतीच ठोस समस्या समोर येत नव्हती.

रुग्णाची एकंदरीत स्थिती पाहता डॉक्टरांच्या टिमने अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेल्या कॅप्सुल एन्डोस्कॉपी करण्याचा निर्णय घेतला, हे एक नॉन इन्व्हेझिव्ह निदान उपकरण आहे ज्यामुळे संपूर्ण छोट्या आतड्याची तपासणी करता येते कारण परंपरागत प्रक्रियेमध्ये या अवयवापर्यंत पोहोचणे खूपच अवघड असते. या मध्ये रुग्णाच्या शरीरात एक अगदी छोटा कॅमेरा असलेली कॅप्सुल सोडली जाते, जी पुढील १२ ते १४ तासांमध्ये गॅस्ट्रोइंटरस्टायनल ट्रॅक्ट मध्ये पोहोचते. त्यातून काही फोटोज काढले जातात आणि ते रुग्णाने धारण केलेल्या बाहेर असलेल्या एक्स्टर्नल रॅकॉर्डर रेकॉर्ड करत असतो.

या प्रक्रिये विषयी आणि उपचारां विषयी बोलतांना पुण्यातील खराडी येथील मणिपाल हॉस्पिटल चे कन्सल्टंट गॅस्ट्रोन्ट्रोलॉजिस्ट डॉ. मंगेश बोरकर यांनी सांगितले कॅप्सुल ने आपला पचनसंस्थेतील प्रवास पूर्ण केल्यानंतर त्यांतून मिळालेली माहिती गोळा करुन तिचा सखोल अभ्यास केला जातो. आंम्हाला या केस मध्ये असे आढळून आले की रुग्णाच्या जेजूनियम आणि इल्युनियम मध्ये फोड आले होते आणि त्यामुळेच रुग्णाच्या आतड्यांमध्ये रक्तस्त्राव होत होता. या अचूक निदाना मुळे आम्ही अचूकपणे निदान करुन योग्य अशी उपचार पध्दती निवडू शकलो आणि अंतिम निष्कर्शात सुधारणा झाली. रुग्णाने योग्य अशा उपचारांना साथ दिल्यामुळे योग्य उपचार होऊन त्यास आम्ही ५ दिवसात घरी पाठवू शकलो.

मणिपाल हॉस्पिटल खराडी, चे हॉस्पिटल डायरेक्टर श्री परमेश्वर दास यांनी सांगितले पुण्यातील खराडी येथील मणिपाल हॉस्पिटल मध्ये आम्ही नेहमीच वैद्यकीय क्षेत्रात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन रुग्णासाठी अचूक निदान आणि योग्य उपचार उपलब्ध करत असतो. या केस मध्ये कॅप्सूल एन्डोस्कोपीचा उपयोग केल्यामुळे आमच्या रुग्णाधिष्ठित अशा उपचारां विषयीची आमची वचनबध्दता तर अधोरेखित होतेच पण त्याच बरोबर समाजासाठीचे सुधारीत आरोग्य निष्कर्श ही अधोरेखित होतात.

**मणिपाल हॉस्पिटल्स विषयी**

आरोग्य क्षेत्रातील एक आघाडीचे असलेले मणिपाल हॉस्पिटल्स हे भारतातील सर्वात मोठ्या हॉस्पिटल नेटवर्क्स पैकी एक असून ते वर्षाला ७ दशलक्षां हून अधिक रूग्णांना सेवा प्रदान करतात. परवडणार्या दरात, उच्च गुणवत्तेची आरोग्य सेवा मल्टी स्पेशॅलिटी आणि टर्शरी केअर देण्याच्या क्षेत्रासह ते आऊट ऑफ हॉस्पिटल केअर क्षेत्रातही कार्यरत आहे. भारतातील मडिका सिनर्जी हॉस्पिटल्स आणि एएमआरआय हॉस्पिटल्स लिमिटेड (सप्टेंबर २०२३ मध्ये अधिग्रहण) चे अधिग्रहण केल्यानंतर आजमितीस संपूर्ण भारतात मणिपाल हॉस्पिटल्स कडून १९ शहरांतील ३७ हॉस्पिटल्स च्या माध्यमातून १०,५०० हून अधिक खाटांचे व्यवस्थापन, ५,६०० हून अधिक कुशल डॉक्टर्स आणि १८,६००हून अधिक कर्मचारी यांचे नेटवर्क निर्माण झाले आहे.

मणिपाल हॉस्पिटल्स हे नेहमीच जगभरांतील रुग्णांना उच्च गुणवत्तेचे आरोग्य सुविधा देणारे हे मल्टीस्पेशॅलिटी हॉस्पिटल ठरले आहे. मणिपाल हॉस्पिटल्सचे उपचार हे एनएबीएच, एएएचआरपीपी मान्यताप्राप्त असून त्यांच्या नेटवर्क मधील अधिकतर हॉस्पिटल्स ही एनएबीएल, ईआर प्रमाणन हे त्यांच्या ब्लड बँकांना प्राप्त आहेत. हे सर्वोत्कृष्ट आरोग्य सुविधांसाठी ओळखले जाते. मणिपाल हॉस्पिटल्स हे प्रतिथयश आणि रूग्णांकडून तसेच भारतातील अनेक ग्राहक सर्वेक्षणातून सर्वाधिक रेटिंग मिळालेले हॉस्पिटल ठरले आहे.

**वाचकाचे पत्र...**

## शाश्वत जगणं



मतदारांना जेवणावळी नको..
तर शाश्वत विकास हवा...
रोजच्या पोटासाठी घासातला घास हवा..
वर्षानुवर्षे तुम्ही हेच करता..
निवडणुका आल्या की दारात येता..
आमच्या फाटक्या चटईवर काय बसता..
फुटक्या बशीतला काळा चहा तुम्ही पिता..
निवडणुकीवेळी तुमच्यातील माणुसकी उफाळून येते..
निवडून द्या मला तुझ्या पोराले नोकरी मी देते...
आश्वासन देऊन तुम्ही निघून जाता..
अनं मग मात्र मागे कधीच वळून न पाहता..
शेजारी उभं असलेलं शेंबडं पोरगंही तुम्हाला तुमचं वाटतं..
बापासारखं आयुष्यभर पाठीशी झेंडा घेऊन उभं रहावं
एवढंच सांगणं असतं..
प्रचारात तुमच्या पायाला भिंगरी असते. ..
एखादी छोटीशी झोपडीही तुमच्यानं सुटत नसते..
मताचा जोगवा मागता दारोदार. .
आश्वासनांची खैरात करता भारोभार..
परंतु,आता हे कुठेतरी थांबायला हवं..
आम्हाला आमचं शाश्वत जगणं मिळायला हवं...
आम्हाला आमचं शाश्वत जगणं मिळायला हवं. ..

**सौ स्नेहा पाटील-थोरात**
**एम ए (मराठी)**
**कळंत्रेवाडी,ता.कराड**



# कु.रेहान खटीक याचा आंतर विभागीय वेटलिफ्टिंग स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक

**कराड/प्रतिनिधी:** कराड येथील यशवंतराव चव्हाण कॉलेजचा खेळाडू कु.रेहान अय्याज खटीक बी एस्सी भाग -१ याने कुरुंदवाड येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर अंतर्गत देवचंद कॉलेज अर्जुनगर आयोजित आंतर विभागीय वेटलिफ्टिंग (पुरुष व महिला) क्रीडा स्पर्धेमध्ये १०९ किलो वजन गटाखाली द्वितीय क्रमांक मिळविला.

त्याला महाविद्यालयाचे जनरल सेक्रेटरी अल्ताफहुसेन मुल्ला साहेब, विश्वस्त सदस्य श्री अरुण पाटील (काका ),प्राचार्य डॉ. एस बी केंगार सर, प्रा. अमरसिंह सावंत सर, क्रांती स्पोर्ट्स क्लब चे सुरेश कुंभार सर, विशाल मुळीक सर यांचे मार्गदर्शन लाभले आणि त्याच्या पुढील कामगिरिस त्याला शुभेच्छा दिल्या.

## कराड शेती उत्पन्न बाजार समिती,कराड
## बाजार भाव
**मंगळवार दि.१२ नोव्हेंबर २०२४**

| | | | |
|---|---|---|---|
| **फळे** | | भोपळा- | - |
| सिताफळ - | - | कारले- | २०० ते ३०० |
| चिकू - | २०० ते ३०० | फ्लॉवर- | १५० ते २०० |
| संफरचंद - | १५०० ते १६०० | कोबी- | १०० ते १५० |
| मोसंबी - | १००० ते १६०० | आले- | ५०० ते ६०० |
| डाळींब - | ६०० ते ८०० | सूरळ- | - |
| केळी - | १२० ते १६० | हिरवी मिरची- | ३०० ते ४०० |
| लिंबू - | - | शेवगा- | ४०० ते ५०० |
| **पालेभाज्या** | | चवळी शेंग | - |
| कोथंबीर - | ८०० ते १२०० | भुईमुग शेंगा- | - |
| मेथी - | ५०० ते १००० | पावटा- | ३०० ते ४०० |
| पालक - | ३०० ते ७०० | हिरवावाटाणा- | - |
| मुळा - | - | गवारी- | ३०० ते ४०० |
| तांदूळ - | - | घेवडा- | २०० ते ३५० |
| शेपू - | ४०० ते १००० | ढबू मिरची- | ६०० ते ७०० |
| **फळभाज्या** | | काकडी - | १०० ते १५० |
| दोडका - | २५० ते ३५० | रताळ- | - |
| वांगी - | २०० ते ३०० | पडवळ- | २०० ते २५० |
| टोमॅटो - | २०० ते २२० | कांदा- | ३०० ते ३८० |
| भेंडी - | २५० ते ३५० | बटाटा- | २०० ते ३०० |
| दूधी - | ८० ते १५० | लसून- | २००० ते ३५०० |

**टिप:- दर प्रति १० किलो/ शेकडा/ १० डझन**

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक श्री.शशिकांत आकाराम पाटील यांनी प्रीतिसंगम प्रिंटर्स, कोयना औद्योगिक वसाहत, मलकापूर-कराड येथे छापून गोदावरी प्लाझा, हेड पोस्टाजवळ, शनिवार पेठ कराड, येथे प्रसिद्ध केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. R.N.I.No.MAHMAR./२००१/१०३३८ रजिस्टर No.MAHMAR/14511/13/1/96/Te पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 *मुख्य कार्यालय:- गोदावरी प्लाझा, हेड पोस्ट जवळ, शनिवार पेठ कराड, जि.सातारा, पिनकोड - ४१५११० फोन (०२१६४)२२७७२५,,फॅक्स २२६९२५, * सातारा कार्यालय:- संजीवन सीटी स्कॅन शेजारी, सिव्हील हॉस्पिटल रोड, सातारा फोन नं:-९२२६३९८८१७ RNI.mar/२००१/१०३३८.
email-pritisangamkarad@gmail.com

# किसनवीरच्या कामगार शेतकऱ्यांसाठी सर्वस्व पणाला लावणार

## आ.मकरंद पाटील



**वाई/प्रतिनिधी:**
किसनवीर कारखान्याच्या सर्वच कामगारांनी आ. मकरंद पाटील यांना एकमुखी पाठिंबा जाहीर करून आमदार मकरंद पाटील यांना सर्वोच्च मतांनी निवडून द्यायचा निर्धार केला दरम्यान कामगारांनी दिलेल्या पाठिंब्यानंतर आ. मकरंद पाटील यांनी आनंद व्यक्त करून सांगितले की माझी आमदारकी चांगली चालली होती पण किसनवीरचे कामगार,शेतकऱ्यांनी केलेल्या विनंतीमुळे मी किसनवीर कारखाना ताब्यात घेतला आणि किसनवीरच्या कामगार शेतकऱ्यांसाठी माझी आमदारकी पणाला लावली, किसनवीर कारखाना यशस्वीरीत्या चालवला. शेतकऱ्यांची सर्व देणी देऊन टाकली कामगारांची दिवाळी गोड केली.

या प्रसंगी किसनवीर कारखान्याचे व्हाईस चेअरमन प्रमोद शिंदे,किसनवीर कारखान्याचे कामगार युनियन अध्यक्ष दत्तात्रय शेलार, उपाध्यक्ष विकास पाटील मोहन कदम, कार्याध्यक्ष अजित पिसाळ, सेक्रेटरी निलेश भोईटे, खजिनदार भरत भोसले, सर्व संचालक, सर्व युनियन पदाधिकारी, किसनवीर चे सर्व कामगार उपस्थित होते.

या प्रसंगी आ. मकरंद पाटील म्हणाले की विधानसभेची निवडणूक आणि कामगारांची बैठक ही माझ्या १५ वर्षाच्या राजकीय कारकीर्दीत पहिल्यांदा घडतंय. तात्यांच्या विचारांचा वारसा घेऊन मी राजकारणात आलो. मागील १५ वर्षात एक विकसनशील मतदार संघ म्हणून मी मतदार संघाची बांधणी केली. माझ्याकडे आलेल्या १०० टक्के लोकांना मी कधीच नाराज होऊन पाठवलं नाही. लोकप्रतिनिधी म्हणून एक गाव अस नाही की ज्या गावामध्ये मागील पाच वर्षात मी किमान एक कोटी रुपयांची विकास कामे केली नाहीत.४५०० कोटी रुपयांची कामे मागील चार वर्षात केली. दिवसरात्र काम करून हा मतदारसंघ विकासात्मक रित्या बांधण्याचा मी प्रयत्न केलाय. माझी आमदारकी इतकी चांगली चालली होती.. पण तरीही तुमच्या आग्रहाखातर एक रुपया खिशात नसताना २ वर्ष कारखाना चालवला. मागील व्यवस्थापनाने १२८०० शेतकऱ्यांचे तब्बल ५४ कोटी रुपये थकवले होते. ते पैसे तर बुडल्यात जमा होते. पण मी मात्र निर्धार केला होता. गरीब शेतकऱ्यांचे पैसे काहीही झालं तरी द्यायचेच. कारखाना वाचवायचा. म्हणूनच आत्ता ही आपल्याला खूप काम करावं लागणारे. करखण्यावरची जप्ती टळली. फक्त किसनवीर कारखान्याच्या कामगार आणि शेतकऱ्यांसाठी अजित पवार यांच्या आघाडीत सामील झालो. सत्ते मध्ये दादांच्या सोबत गेलो त्याचा फायदा आपल्याला झाला.

फक्त आणि फक्त ऊस उत्पादक सभासद आणि कामगारांच्या आग्रहाखातर कारखान्याची निवडणूक लढवली. कारखाना ताब्यात घेतला त्यावेळी कारखान्याची अवस्था तुम्हाला चागलीच माहीत होती. कारखान्याची जप्ती होणार होती.१००० कोटींचे कर्ज होत.३०० कोटी रुपयांचा तोटा होता. भारतातील कोणतीही बँक कारखान्याला कर्ज द्यायला तयार न्हवती. प्रचंड मोठं आव्हान होत आमच्या समोर. पण आलेल्या प्रत्येक संकटावर मात करीत मागील २ वर्ष कारखाना यशस्वीरीत्या चालवला. या निवडणुकीत घडल्याच्या चीन्हा समोरील बटण दाबून मला प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन आ. मकरंद पाटील यांनी केले.

आपल्या प्रास्ताविकपर भाषणात किसनवीर कारखान्याच्या कामगार युनियन चे अध्यक्ष दत्तात्रय शेलार म्हणाले की आबा हे खऱ्या अर्थाने जननायक आहेत.

किसनवीर कारखान्याचे व्हॉईस चेअरमन प्रमोद शिंदे म्हणाले की मकरंद आबांनी मागील ३ वर्षात ४००० कोटी ची कामे केली आहेत. कामगारांना न्याय मिळाला पाहिजे, शेतकऱ्यांना न्याय मिळाला पाहिजे म्हणून कामगार आणि शेतकऱ्यांनी आबांना साकडं घातलं. आबांच्या विजया मध्ये कारखान्याचा सहभाग असावा.

# ..अन त्या दोघा भावांची शाळा पुन्हा सुरू झाली

## गणेश भोकरे यांनी शैक्षणिक शुल्क भरत जपली निवडणूक काळातही सामाजिक बांधिलकी



**पुणे/प्रतिनिधी:**
हलाखीची आर्थिक परिस्थिती... शाळेची फी न भरल्याने मुलांची शाळा बंद... मुलांनी शिकावे ही आईची तळमळ... ती मायमाऊली मनसेच्या कार्यकर्त्याला भेटते, तिची व्यथा मांडते आणि तिच्या मुलांना शाळेत जाण्याची दारे पुन्हा खुली होतात. हा भावनिक प्रसंग अनुभवला, तो महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे कसबा मतदारसंघातील अधिकृत उमेदवार गणेश भोकरे यांनी.

निवडणुकीची रणधुमाळी सुरु असताना, प्रचाराचा जोर वाढलेला असतानाही गणेश भोकरे यांनी आपली सामाजिक बांधिलकी जपत मुलांची फी भरली आणि त्यांची शाळा पुन्हा सुरु झाली. आपल्या लेकरांची शाळा पुन्हा एकदा सुरु झाल्यानंतर त्या मायमाऊलीच्या डोळ्यातील आनंदाश्रू पाहून भोकरे यांच्यासह कार्यकर्तेही भारावले.

कसबा पेठेतील पात्रे ताईंची व्यथा ऐकल्यानंतर प्रचार बाजूला ठेवत भोकरे यांनी संबंधित शाळेला भेट देऊन व्यवस्थापनाशी चर्चा केली. आपल्या निवडणूक खर्चातून दोन्ही मुलांची शाळेची फी भरली. आता ही दोन्ही मुले पुन्हा शाळेत जाऊ लागली आहेत. लोकांना केवळ मदतीची आश्वासने देणारा नाही, तर प्रत्यक्ष कामातून त्यांच्यासोबत उभा राहणारा हा राज ठाकरेंचा शिलेदार असल्याचे भोकरे यांनी कृतीतून दाखवून दिले.

गणेश भोकरे म्हणाले, फीअभावी शाळा बंद पडल्याचे समजल्यावर फार वाईट वाटले. त्यामुळे प्रचाराची वाट वळवत कार्यकर्त्यांसह शाळा गाठली. प्राचार्यांशी चर्चा करून मी दोन्ही मुलांच्या फीचा काही भाग भरला. मुलांची शाळा पुन्हा सुरु झाली. निवडणूक प्रचारातील काही खर्च टाळून ही शैक्षणिक मदत केल्याचे समाधान आहे.

मुलांची आई म्हणाली, गेल्या दीड-दोन वर्षांपासून आर्थिक स्थिती ठीक नसल्याने फी भरता आली नव्हती. अनेक मोठ्या लोकांना भेटले. पण मदत मिळाली नाही. गणेशभाऊ भोकरे यांना भेटले आणि अनेक महिन्यांपासून माझ्या मुलांची बंद असलेली शाळा पुन्हा सुरु झाली. लोकांच्या मदतीला धावणारा प्रामाणिक भाऊ भेटल्याचा आनंद वाटतो.

# कराड दक्षिण विधानसभा मतदार संघातील स्ट्राँगरूमला निवडणूक निरीक्षण गीता ए. यांची अचानक भेट

**कराड/प्रतिनिधी:**
२६०, कराड दक्षिण विधानसभा मतदार संघातील मतदान केंद्रावर पाठविण्यासाठी मतदान यंत्रे तयार करून सुरक्षितपणे ठेवण्यात आलेल्या स्ट्राँगरूमला तसेच मतदान यंत्र तयार करण्याचे काम सुरू असलेल्या सिलिंग हॉलला आज निवडणूक निरीक्षण गीता ए. यांनी अचानक भेट देऊन पाहणी केली. पाहणी दरम्यान प्रथम त्यांनी मशीन्सच्या सिम्बॉल लोडिंगची तपासणी करून १००% यशस्वी झाल्याबद्दल समाधान व्यक्त केले. त्यानंतर त्यांनी २० मशीन्सवर ५ टक्के मोकपॉल व्यवस्थितपणे सुरू आहे का याचीही चाचपणी केली.

तसेच यावेळी उपस्थित असलेल्या उमेदवारांच्या प्रतिनिधींशीही त्यांनी चर्चा करत त्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या. आणि कामकाजाबाब पडताळणी केली. चर्चेदरम्यान उमेदवारांच्या प्रतिनिधींनी एकूणच सर्व कामकाजाबाबत आम्ही समाधानी आहोत असा निर्वाळा दिला. त्यानंतर निवडणूक निरीक्षक गीता ए यांनी ३९ टेबलवर सेक्टर ऑफिसर्स व त्यांच्या टीमकडून तयार करण्यात



कराड दक्षिण मतदार संघाच्या स्ट्राँग रूमची व तयार करण्यात येत असलेल्या मशीन्सची पाहणी करताना निवडणूक निरीक्षक गीता ए. समवेत निवडणूक निर्णय अधिकारी अतुल म्हेत्रे, स्मिता पवार, प्रताप पाटील, हेमंत बेसके, युवराज पाटील.

येत असलेल्या मतदान यंत्रांच्या कामकाजाचा प्रत्येक टेबलवाईज आढावा घेतला व युद्ध पातळीवर सुरू असलेल्या एकंदरीत कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले.

यादरम्यान त्यांना निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अतुल म्हेत्रे यांनी एकूण कार्यरत असलेल्या यंत्रणेबाबत व त्यासाठी केलेल्या नियोजनाबाबत सविस्तर माहिती दिली. निवडणूक निरीक्षण गीता ए यांनी अत्यंत नियोजनबद्ध व शिस्तबद्धपणे सुरू असलेल्या कामकाजाबद्दल निवडणूक निर्णय अधिकारी अतुल म्हेत्रे व त्यांच्या संपूर्ण सहकारी टीमचे अभिनंदन करून कौतुक केले. यावेळी निरीक्षकांसमवेत असलेले एक्झिक्यूटिव्ह इंजिनियर घनवट, डेप्युटी इंजिनियर चौधरी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी स्मिता पवार, आचारसंहिता सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी प्रताप पाटील, निवडणूक नायब तहसीलदार हेमंत बेसके, प्रभारी नायब तहसीलदार युवराज पाटील, निवासी नायब तहसीलदार बाबुराव राठोड, नायब तहसीलदार व्ही.आर.रजपूत, गोपाल वसू उपस्थित होते.

# आयात उमेदवार लादल्यामुळेच शिवसेनेला जय महाराष्ट्र

## पक्ष बांधणीची मेहनत वरिष्ठांनी समजावून घेतली नाही :सचिन मोहिते

**सातारा/प्रतिनिधी:**
सातारा जिल्ह्यातील शिवसेनेच्या बांधणीसाठी मी अथक नऊ वर्षे प्रयत्न केले. मात्र विधानसभा निवडणुकीच्या वेळी काही दलालांच्या आग्रहामुळे आयात उमेदवार आमच्यावर लादला गेला .त्यामुळे आमच्यातील शिवसैनिक दुखावला ज्यावेळी शिवसैनिकांच्या सुखदुःख प्रसंगी वरिष्ठांच्या मदतीची गरज होती तेव्हा कोणीच मदतीला धावले नाही जर वरच्या पातळीवरून रसद मिळणार नसेल तर कार्यकर्त्यांनी दाद कोणाकडे मागायची ? अशी मळमळ शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख सचिन मोहिते यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केली

सचिन मोहिते यांनी नुकताच फलटण येथील मेळाव्यात राष्ट्रवादी अजित दादा पवार गटामध्ये प्रवेश केला त्यानंतर आपण शिवसेनेला जय महाराष्ट्र का केला ही भूमिका मांडण्यासाठी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला

ते पुढे म्हणाले, शिवसैनिकांना सातत्याने प्रोत्साहित करणे वेळोवेळी जनआंदोलनाच्या माध्यमातून शिवसेनेला समोर आणणे सर्वसामान्यांच्या प्रश्नांना न्याय देण्याचा प्रयत्न करणे ही भूमिका आम्ही प्रामाणिकपणे नऊ वर्षे पार पाडली .पश्चिम महाराष्ट्र संपर्क मंत्री यांचा प्रोटोकॉल आम्ही कधीही तोडला नाही ना कधी त्यापेक्षा वरिष्ठ पातळीवरील मंत्र्यांशी संपर्क केला नाही .ज्यावेळी विधानसभा निवडणुकींसाठी शिवसेनेचा कट्टर उमेदवार तयार असताना राजकीय तडजोडी मध्ये आमच्यावर आयात उमेदवार लादला गेला तसेच त्याचा प्रचार करावा लागेल अशी सक्ती करण्यात आली मात्र आमच्यासारख्या शिवसैनिकांना ते पटले नाही .कट्टर शिवसैनिकाला संधी देण्याऐवजी आयात उमेदवार आमच्या पुढे उभे करणे ही बाब कुठेतरी खेद वाटणारी होती तसेच फायनान्स कंपन्यांच्या विरोधात ज्यावेळी आम्ही आंदोलन केली तेव्हा आम्ही बेधडक त्यामध्ये उतरलो सर्वसामान्यांच्या प्रश्नांना न्याय दिला .मात्र कायदा हातात घेतला म्हणून आमच्यावर गुन्हे दाखल झाले त्या कायद्याच्या कचाट्यातून सुटण्यासाठी व्यक्तिगत पातळीवर मला खूप धावपळ करावी लागली वरिष्ठ पातळीवरून कोणतीही मदत आम्हाला मिळाली नाही जर वरिष्ठ नेते आमच्याकडे लक्ष देणार नसेल तर आम्ही कार्यकर्त्यांनी कोणाकडे दाद मागायची असाच सवाल त्यांनी केला

त्यामुळे तेव्हाच पक्ष बदलण्याचा निर्णय आम्ही घेतला होता राष्ट्रवादी अजितदादा गटांमध्ये सध्या आम्ही प्रवेश केला आहे अजित दादा पवार हे राज्यव्यापी आणि सर्वमान्य नेतृत्व आहे त्यांच्या माध्यमातून साताऱ्यातील सामाजिक प्रश्न सोडवण्यासाठी सातत्याने सक्रिय राहणार असल्याचे सचिन मोहिते यांनी सांगितले



भाजपा महायुतीचे उमेदवार संग्राम देशमुख यांनी पलूस तालुक्यातील सावंतपूर येथील कॉंग्रेस कार्यकर्ते ऋषिकेश जावीर, सौरभ सूळे, सत्यजित जाधव, विकास यादव, अंकुर सुतार, दिनेश हलसकर यांचे भाजपमध्ये स्वागत केले.

# पलूस कडेगावमध्ये काँग्रेसची पडझड सुरूच

## सावंतपूर व रायगाव येथील नेते कार्यकर्ते भाजपमध्ये दाखल

**कडेगांव/प्रतिनिधी:**
पलूस कडेगाव विधानसभा मतदारसंघात काँग्रेसची पडझड सुरूच असून पलूस तालुक्यातील सावंतपूर व कडेगांव तालुक्यातील रायगाव येथील नेते आणि कार्यकर्ते काँग्रेस पक्ष सोडून भाजपमध्ये दाखल झाले. भारतीय जनता पार्टी महायुतीचे अधिकृत उमेदवार संग्राम देशमुख यांनी सर्वांचे स्वागत केले.

पलूस-कडेगाव विधानसभा मतदारसंघातील पलूस तालुक्यातील सावंतपुर येथील कॉंग्रेस पक्षातील प्रमुख कार्यकर्ते ऋषिकेश जावीर, सौरभ सूळे, सत्यजित जाधव, विकास यादव, अंकुर सुतार, दिनेश हलसकर, अभिजीत जाधव, अभिषेक जाधव, सागर जाधव, गणेश सावंत यांच्या सोबत अनेक कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

कडेगाव तालुक्यातील रायगांव येथील भालचंद्र शंकर घाडगे यांच्यासह कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

या वेळी पलूस तालुक्यातील सावंतपुर तसेच रायगांव गावातील भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व सहकारी उपस्थित होते.

# पंतप्रधानांच्या विकासाच्या संकल्पपूर्तीसाठी महाराष्ट्र महायुतीसोबत

## भाजपचे सातारा जिल्हाध्यक्ष धैर्यशीलदादा कदम यांचा विश्वास



**सातारा/प्रतिनिधी:**
महाराष्ट्राला देशातील पहिल्या क्रमांकाचे विकसित राज्य बनविण्याचा भारतीय जनता पार्टीचा संकल्प असून राज्याची अर्थव्यवस्था १ ट्रिलीयन डॉलर्सपर्यंत पोहोचविण्यासाठी गतिमान विकास हे भाजपाचे ध्येय आहे, असे भाजपाचे धैर्यशीलदादा कदम यांनी आज स्पष्ट केले. विधानसभा निवडणुकीनिमित्त भाजपाच्या संकल्पपत्राचे प्रकाशन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह याच्या हस्ते रविवारी मुंबईत प्रकाशन झाले. पक्षाच्या संकल्प पत्राची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत धैर्यशीलदादा कदम बोलत होते. यावेळी प्रदेश कार्यकारिणीचे विक्रम पावसकर,भाजप उपाध्यक्ष राहुल शिवनामे, सरचिटणीस विठ्ठल बलशेटवार, लोकसभा संयोजक सुनील काटकर, भाजप शहराध्यक्ष विकास गोसावी इं उपस्थित होते.

भारतीय जनता पार्टीने दिलेली अनेक आश्वासने पूर्ण केली असल्याने देशातील जनतेने लोकसभा निवडणुकीत भाजपाला पुन्हा सत्तेचा कौल दिला आहे. केंद्रातील मोदी सरकारच्या संकल्पपूर्तीसाठी महायुतीने महाराष्ट्रातही ठोस विश्वासाने वाटचाल सुरु केली, महाराष्ट्र हे मजबूत, समृद्ध, सुरक्षित राज्य बनवू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

जम्मू काश्मीरमध्ये कलम ३७० पुन्हा लागू करण्यासाठी काँग्रेस आघाडीतील पक्षांनी कंबर कसली आहे, आणि तेच पक्ष आता महाराष्ट्रात संविधानाच्या नावाने कोरे कागद दाखवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संविधानाचा अपमान करत आहेत. जनतेची अशी फसवणूक करणाऱ्या राहुल गांधीना, काँग्रेसला आणि त्यांच्या आघाडीला महाराष्ट्रातील मतदार थारा देणार नाहीत असा विश्वास धैर्यशीलदादा कदम यांनी यावेळी व्यक्त केला.

कलम ३७० रद्द करून भाजपाने जम्मू - काश्मीरला देशाच्या मुख्य प्रवाहात आणले, तीन तलाक पद्धती रद्द करून मुस्लिम समाजातील पीडित महिलांना दिलासा दिला, याशिवाय नागरिकत्व कायद्यात दुरुस्ती (सीएए) , राम मंदिर उभारणी अशी अनेक आश्वासने भारतीय जनता पार्टीच्या सरकारने पूर्ण केली आहेत, असे ते म्हणाले.

भाजपा महायुती सरकारने २०१४ मध्ये महाराष्ट्रात सत्तेवर आल्यानंतर महाराष्ट्राच्या विकासाला गती देणारे अनेक निर्णय घेतले. भारतीय जनता पार्टीने समाजाच्या सर्व घटकांचा विचार करून तयार केलेले संकल्प पत्र हे राज्याच्या जनतेचे आकांक्षा पत्र आहे, असेही धैर्यशीलदादा कदम यांनी नमूद केले. महायुती सरकारच्या काळात पूर्ण झालेल्या निळवंडे, गोसीखुर्द, टेम्भू या सिंचन योजना, कोस्टल रोड, अटल सेतू सारखे रस्ते, पूल, नार पार सारखे नदीजोड प्रकल्प यांचा आढावाही यावेळी घेत धैर्यशीलदादा कदम यांनी महाविकास आघाडीवर जोरदार टीका केली. अंतर्विरोधाने भरलेल्या महाविकास आघाडीने सत्तेसाठी तुष्टीकरणाची विचारधारा स्वीकारली आहे, असा आरोप करून ते म्हणाले की, तेलंगणा, हिमाचल प्रदेश, कर्नाटक या राज्यांत निवडणूक काळात दिलेली आश्वासने पूर्ण करण्यात काँग्रेसला अपयश आले आहे. कर्नाटकमध्ये अनेक गावे ''वक्फ'' ची मालमत्ता म्हणून घोषित झाली आहेत. सामान्य माणसाची मालमत्ता वक्फ च्या घशात जाऊ नये यासाठी मोदी सरकारने वक्फ बोर्ड दुरुस्ती विधेयक आणले आहे, याकडे धैर्यशीलदादा कदम यांनी लक्ष वेधले .

या संकल्पपत्रासाठी सामान्य नागरिकांकडून सूचना मागविण्यात आल्या होत्या. ८७७ गावांतून ई मेल, पत्रे आली. ८ हजार ९३५ सूचना आल्या. संकल्प पत्रातील एकेक मुद्द्यांच्या आधारे त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी समिती नेमली जाईल, अशी माहिती त्यांनी दिली. विकसित भारतासाठी विकसित महाराष्ट्र तयार करण्याचा आमचा संकल्प या संकल्प पत्रातून स्पष्ट झाला असून , पंतप्रधान नरेंद्र मोदींची स्वप्ने प्रत्यक्षात आणण्याचे काम या संकल्प पत्रातून होत आहे, असे ते म्हणाले. महाराष्ट्राची सुजाण जनताही या संकल्पांच्या पूर्ततेसाठी महायुतीसोबत राहील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# आ.विश्वजित कदम यांच्या प्रचारासाठी युवक मैदानात

## बिड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील युवक करतायेत कडेगाव पलुसमध्ये प्रचार

**कडेगाव/प्रतिनिधी:**
माजी मंत्री आ.विश्वजित कदम यांच्या प्रचारासाठी राज्यातील युवक पलुस कडेगावच्या मैदानात उतरले असुन बिड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील धानोरा गावातील युवक अविनाश शेळके राजू एकशिंगे राजू आवटे हे युवक कडेगाव पलुस तालुक्यातील विविध गावात प्रचार करीत आहेत.

राज्यामध्ये आ.विश्वजित कदम यांनी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्षपद असताना मोठ्या प्रमाणात कार्य केले आहे त्यामुळे तरूणामध्ये विश्वजित कदम यांच्या नावाची एक वेगळी क्रेझ आहे विश्वजित कदम यांनी कार्यकर्त्यांना संभाळून घेऊन कार्यकर्त्यांना ताकत देण्याची भूमिका घेतल्यामुळे विश्वजित कदमांचे काँग्रेस पक्षामध्ये वेगळे स्थान निर्माण झाले आहे विश्वजित कदम यांच्या या प्रेमामुळे राज्यातील बिड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील धानोरा



माजी मंत्री आ.विश्वजित कदम यांचा प्रचार करताना बिड जिल्ह्यातील युवक अविनाश शेळके राजू एकशिंगे व राजू आवटे

गावातील अविनाश शेळके राजू एकशिंगे व राजू आवटे हे युवक गेले आठ दिवस झाले रामनंदनगर येथील मित्राच्या घरी राहुन कडेगाव पलुस मध्ये प्रचारासाठी फिरत असल्याचे पाहयला मिळत आहे.

याबाबत बोलत असताना अविनाश शेळके म्हणाले की विश्वजित कदम यांनी मराठवाडा तसेच राज्यात युवक काँग्रेसच्या माध्यमातून मजबूत फळी निर्माण केली आहे आमच्या अडिअडचणींच्या काळामध्ये मदत करणारा नेता म्हणून आम्ही विश्वजित कदमांच्याकडे पाहतो आमच्या प्रत्येक हाकेला साथ देण्याची भुमिका विश्वजित कदम यांनी घेतल्याने कडेगाव पलुसमध्ये त्यांच्या विकासाचा विचार बळकट करण्यासाठी आणी त्याचा प्रसार करण्यासाठी आम्ही येवून प्रचार करीत आहोत विश्वजित कदम हे लक्षावधी मतांनी निवडून येणार त्यामध्ये आमचा खारीचा वाटा असेल अशी भुमिका अविनाश शेळके राजू एकशिंगे राजू आवटे या तरुणांनी व्यक्त केला.

# पुरोगामी संघटना जातीयवादी पक्षांच्या पराभवासाठी महाविकास आघाडीचे उमेदवार आ.जयंत पाटील यांच्या प्रचारात उतरणार

**इस्लामपूर/प्रतिनिधी:**
देशातील लोकशाही व संविधानापुढील धोका अद्याप टळलेला नाही. त्यातच भाजपची ' बटेंगे तो कटेंगे ' ही घोषणा देशाला पुन्हा विभाजनाकडे नेणारी आहे. त्यामुळे अशा जातीयवादी पक्षाला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी आम्ही महाविकास आघाडीच्या सोबत रहाणार आहोत. महाविकास आघाडी चे इस्लामपूर विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार आ.जयंतराव पाटील यांच्या विजया साठी आम्ही प्रचार सभा घेणार आहोत,अशी माहिती वाळवा तालुक्यातील पुरोगामी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी इस्लामपूर येथील पत्रकार बैठकीत दिली.

श्रमिक मुक्ती दल (लोकशाहीवादी) चे काँ.धनाजी गुरव म्हणाले, तालुक्यातील पुरोगामी



संघटनांच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत हा निर्णय घेतला आहे. आम्ही मतदारांपर्यंत जाऊन आमची भुमिका मांडू. जातवार जनगनना महत्वाची असताना ती केली जात नाही. ओबीसींना आरक्षण द्यायला लागेल म्हणून भाजपने नगरपालिका व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकाच रद्द केल्या,हे भयानक आहे. २०११ साली झालेली जनगणना दाबून ठेवत आकडेवारी दिली नाही. केंद्राने ५० टक्के आरक्षणाची अट्ट कायम ठेवली. यातून ओबीसींच्या दोन पिढ्या बरबाद केल्या. त्यांचा ओबीसी व मराठा आरक्षणाला विरोध आहे. आघाडीचा जाहीर नामा सर्वांना सामाजिक न्याय देणारा,मराठा -ओबीसी आरक्षण सुरक्षित करणारा आणि चौफेर विकासाचा पाया घालणारा आहे.

बळीराजा शेतकरी संघटनेचे नेते बी.जी. पाटील म्हणाले,कायदेशीर मार्गाने मराठा आरक्षण मागणाऱ्या आमच्या माणसांवर या सरकारने लाठ्या-काठ्या चालविल्या,हे मराठा समाज विसरलेला नाही. ज्यांच्यावर करोडो रुपयांच्या भ्रष्टाचाराचे आरोप आहेत. त्याच लोकांना भाजपने सत्तेसाठी सोबत घेतले. अशा पक्षाला आम्ही मतदान का करावे? मराठा सेवा संघाचे उमेश कुरळपकर म्हणाले,आम्ही इस्लामपूर मतदारसंघात स्वतंत्र १२ सभा घेणार आहोत.

दलित महासंघाचे शंकर महापुरे म्हणाले, यावेळी भाजपच्या आमिषाला मतदार बळी पडणार नाहीत.

संभाजी ब्रिगेडचे उमेश शेवाळे म्हणाले, जातीयवादी पक्ष पुन्हा सत्तेवर येवू नये,हा आमचा प्रयत्न आहे.

शेकाप चे प्रा.एल.डी. पाटील, अंनिसचे संजय बनसोडे, डीपीआयचे नंदकुमार नांगरे, आपचे गजानन पाटील, रविंद्र चौधरी, डॉ. भगवान पाटील,सागर रणदिवे, दिग्विजय पाटील,अजित हवलदार, समीर तांबोळी, सत्यजित जाधव, लहुजी वाघमारे,अहमद मुंडे, रणजित जाधव(मेजर),प्रा.सुभाष ढगे, अभिजित शिंदे,सुहास पाटील आदी 'निर्भय बनो'चे कार्यकर्ते उपस्थित होते.

# विटा तडसर रोडवर पकडला चक्क विषारी पांढऱ्या रंगाचा साप

**विटा/प्रतिनिधी:**
सागली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील विटा तडसर रोडवर चक्क पांढऱ्या रंगाचा साप एका शेतकऱ्याच्या नजरेत आला आणि तो साप एक सर्प मित्राने पकडून सुरक्षित ठिकाणी सोडला .

मात्र हा रंगीबेरंगी सर्प पाढऱ्या रंगाचा पकडल्यावर नागरिकांनी हा सर्प पहाण्यासाठी विटा तडसर वांगी परिसरात गर्दी केली होती. कोणी म्हणी दैव शक्ती असावी कोणी म्हणावे देवाचा वासा असेल अशी महिला व नागरीकातून चर्चा होत होती ही घटना शेतकरी व नागरीकातून चांगलीच



रंगली होती .मात्र कोणतीही इजा या सर्पाला न होतो सुरक्षित मात्र जंगलवनात सोडण्यात आले.

# महाबळेश्वरमध्ये मतदान जागृतीसाठी सायकल व बाईक रॅली

**सातारा/प्रतिनिधी:**
२५६ वाई विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने महाबळेश्वर येथे विधानसभा निवडणुकीच्या मतदान जनजागृती साठी सायकल व बाईक रॅली काढण्यात आली. प्रशासनातर्फे मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी व लोकांमध्ये लोकशाहीचे महत्त्व वाढवण्यासाठी स्वीपअंतर्गत या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

या रॅलीमध्ये महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी योगेश पाटील,स्वीप नोडल अधिकारी, मुख्यलिपिक आबाजी ढोबळे, कर निरीक्षक अमित माने,अंतर्गत लेखापाल, सचिन कदम, स्वच्छता निरीक्षक प्रमोद कुंभार, मुख्याध्यापक परमेश्वर माने यांच्या मार्गदर्शनाखाली महाबळेश्वर शहरात सायकल बाईक रॅली काढण्यात आली. यावेळी शालेय विद्यार्थी सहभागी होते. रॅलीस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



# नोटीसीचे उल्लंघन केल्याप्रकरणी दोघा विरोधात तक्रार

**सातारा/प्रतिनिधी:**
नगरपालिकेच्या नोटीसीचे उल्लंघन केल्याप्रकरणी दोनजणांविरोधात शाहूपुरी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

दि. १२ एप्रिल २०२३ ते ८ नोव्हेंबर २०२४ दरम्यान मनोज रामचंद्र मोरे आणि योगेश रामचंद्र मोरे दोन्ही रा. दत्त कॉलनी, आंबेदरे रोड, सातारा यांना सातारा नगरपरिषदेने खुल्या जागेमधील अतिक्रमित बांधकाम संदर्भात नोटीस बजावली होती. असे असतानाही संबंधितांनी बजावण्यात आलेल्या नोटिसीचे उल्लंघन केल्याने त्यांच्या विरोधात शाहुपुरी पोलीस ठाण्यात नगरपालिकेच्यावतीने तक्रार देण्यात आली आहे. पोलिसांनी त्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पोलीस हवालदार बाबर करीत आहेत.

# राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाकडून वाहनासह १४ लाख २८ हजार रुपयांचा गोवा बनावटीचा मद्यसाठा जप्त

**कोल्हापूर/प्रतिनिधी:** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कोल्हापूर जिल्हा भरारी पथक क्रमांक १ कडून वाहनासह १४ लाख २८ हजार ६०० रुपयांचा गोवा बनावटीचा मद्यसाठा वाहनासह जप्त करण्यात आला आहे. यातील निव्वळ मद्याची किंमत ९ लाख ७८ हजार ६०० रुपये असल्याची माहिती कोल्हापूर राज्य उत्पादन शुल्क भरारी पथकाचे निरीक्षक एस.एम. मस्करे यांनी दिली आहे.

कोल्हापूर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधीक्षक स्नेहलता श्रीकर-नरवणे व उपअधीक्षक युवराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा भरारी पथक क्रमांक १ ला राधानगरी – कोल्हापूर रोडवरून एका चारचाकी सिल्व्हर कलरच्या जेनिओ वाहनातून अवैध गोवा राज्य निर्मित विदेशी मद्याची वाहतूक होणार असल्याची माहिती मिळाली. या पथकाने कोल्हापूर–राधानगरी रोड, क्रशर चौक, इराणी खान रंकाळा तलाव जवळ,



कोल्हापूर शहर येथे सापळा लावून पाळत ठेवली असता दिनांक १० नोव्हेंबर रोजी सकाळी ७.३० वाजण्याच्या सुमारास एक संशयित इसम चारचाकी महिंद्रा कंपनीची जेनिओ रजि.क्र. चक-०७-झ-४७५५ येत असलेली दिसली. या वाहनास थांबवून वाहनाची तपासणी केली असता पाठीमागील हौदामध्ये गोवा राज्य निर्मित, गोवा राज्यात विक्रीस परवानगी असलेले व महाराष्ट्र राज्यात विक्रीस बंदी असलेले विदेशी मद्य व बिअर ने भरलेले कागदी पुठ्ठ्याचे विविध बँडचे १८०, ५०० तसेच ७५० मिलीचे एकुण १५१ बॉक्स आढळून आले.

या प्रकरणी प्रसाद महादेव नराम व.व.५१, रा. घर नं-११८४, मु.पो. फोंडाघाट, हवेली नगर, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग-४१६६०१ या आरोपीस अटक केली असून पकडण्यात आलेल्या जेनिओ मध्ये गोवा राज्य निर्मित व महाराष्ट्रात प्रतिबंधीत असलेले विदेशी मद्य व बिअर चा मद्यसाठा आढळून आला आहे. वाहनासह मद्याची एकूण किंमत १४ लाख २८ हजार ६०० रुपयांची असून निव्वळ मद्याची किंमत ९ लाख ७८ हजार ६०० रुपये इतकी आहे. या गुन्हामध्ये सापडलेल्या आरोपी व्यतिरिक्त त्याच्या इतर साथीदारांचा सहभाग आहे का? तसेच या मद्याचा कोठे पुरवठा करणार होता? याबाबतचा तपास सुरु आहे. या गुन्ह्यातील आरोपीवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

या कारवाईत राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर भरारी पथक क्रमांक १ चे निरीक्षक सदानंद मस्करे, दुय्यम निरीक्षक गिरीशकुमार कर्चे, दुय्यम निरीक्षक अभयकुमार साबळे, सहायक दुय्यम निरीक्षक कांचन सरगर व जवान विलास पवार, विशाल भोई, सचिन लोंढे, धीरज पांढरे, प्रसाद माळी, साजिद मुल्ला यांनी सहभाग घेतला. या गुन्ह्याचा पुढील तपास दुय्यम निरीक्षक गिरीशकुमार कर्चे हे करत आहेत.

# किसन वीर व खंडाळा कारखान्याचा गळीत हंगामाचा आज शुभारंभ

**वाई/प्रतिनिधी:** भुईंज येथील किसन वीर सातारा सहकारी साखर कारखाना व खंडाळा सहकारी साखर कारखान्याचा सन २०२४-२५ चा गळीत हंगामाचा शुभारंभ बुधवार (दि. १३) रोजी होणार आहे. खंडाळा कारखान्याचा सकाळी १० वाजता तर किसन वीर कारखान्याचा दुपारी १ वाजता कार्यक्षेत्रातील पाच ऊस उत्पादक सभासद शेतकऱ्यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती कारखान्याचे व्हाईस चेअरमन प्रमोद शिंदे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली.

प्रसिध्दीपत्रकात पुढे म्हटले आहे की, शासनाने राज्यातील साखर कारखाने १५ नोव्हेंबरपासून कारखाने सुरू करण्याबाबत सुचित केलेले होते. किसन वीर व खंडाळा कारखान्यातील सर्व अंतर्गत कामे पुर्ण झालेली असून कारखाना गळितासाठी सज्ज झालेला आहे. किसन वीर व खंडाळा कारखान्याकडे ऊस तोडणी मजुरही दाखल झालेले आहेत. मागील दोन हंगाम आपण यशस्वीरित्या चालवुन शेतकरी व वाहन मालकांचे संपुर्ण पेमेंट अदा केल्यामुळे तसेच मागील संचालक मंडळाच्या काळातील सन २०२०–२१ मधील थकीत ऊस बील ५४ कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग केल्यामुळे कारखान्यावर विश्वास वाढलेला आहे. किसन वीर व खंडाळा या दोन्ही कारखान्यांचे आठ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट संचालक मंडळाने डोळ्यासमोर ठेवलेले आहे. हा गळीत हंगाम शेतकरी व कामगारांच्या सांघिक प्रयत्नातुन यशस्वी करणार आहोत. या गळित हंगामातही एफआरपीप्रमाणे होणारी रक्कम आपण देणार असून सभासद व बिगर सभासद शेतकऱ्यांनी कोणत्याही भुलथापांना बळी न पडता आपला संपुर्ण ऊस किसन वीर व खंडाळा कारखान्यालाच गाळपासाठी देण्याचे आवाहनही श्री. शिंदे यांनी केलेले आहे.

किसन वीर कारखान्याच्या गळीत हंगाम शुभारंभास कार्यक्षेत्रातील सर्व सभासद बंधू-भगिनी, हितचिंतक, कंत्राटदार, वाहन मालक आणि कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहनही व्हाईस चेअरमन प्रमोद शिंदे, खंडाळा कारखान्याचे चेअरमन व्ही. जी. पवार, व्हाईस चेअरमन राजेंद्र तांबे, किसन वीर व खंडाळा कारखान्याचे संचालक जितेंद्र रणवरे व दोन्ही कारखान्याच्या संचालक मंडळाने केले आहे.

# जनतेचे अश्रू पुसण्यासाठी गणपतराव पाटील यांना शिरोळ मधून निवडून द्या

## माजी मंत्री सतेज उर्फ बंटी पाटील

**शिरोळ/प्रतिनिधी:** महायुती फसव्या सरकारला जागा दाखविण्यासाठीची ही निवडणूक आहे. महायुतीचे, अविश्वासाचे सरकार की महा विकास आघाडीचे विश्वासाचे सरकार सत्तेत आणायचे याचा निर्णय आपल्याला घ्यावा लागेल. मताचे विभाजन करून सत्तेची पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न महायुती करत असून तांदळातील खड्याप्रमाणे या सरकारला बाजूला करावे लागेल. विकासाचा हा रथ शिरोळ तालुक्यातून पुढे जाईल, त्यासाठी गणपतराव पाटील यांच्या रूपाने विकासात्मक आणि सुसंस्कृत नेतृत्व जोपासावे लागेल. जनतेचे अश्रू पुसण्यासाठी मविआला निवडून द्या, असे आवाहन काँग्रेसचे कोल्हापूर जिल्हा अध्यक्ष, माजी मंत्री सतेज उर्फ बंटी पाटील यांनी केले.

शिरोळ विधानसभेचे महाविकास आघाडीचे उमेदवार गणपतराव पाटील यांच्या प्रचारार्थ कुरुंदवाड येथील डॉ, बाबासाहेब आंबेडकर चौकात आयोजित जाहीर प्रचार सभेत ते बोलत होते. यावेळी पुढे बोलताना पाटील म्हणाले शिरोळ मध्ये छ. शिवाजी महाराजांचा पुतळा आणि जयसिंगपूर येथे क्रांती चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारण्याची जबाबदारी मी व गणपतराव पाटील घेत असल्याचे सतेज पाटील यांनी सांगितले.तर कॉ. धनाजी गुरव म्हणाले, संविधानाने जे मिळवले ते नष्ट करण्याची भूमिका घेऊन महायुती काम करत आहे. भ्रष्टाचार लपवण्यासाठी भाजपा बरोबर गेलेल्या उमेदवारांना मते मागताना लाजही वाटत नाही. या सर्वांना गरिबांच्या चुली पेटवायच्या नाहीत, पण माणसे कशी पेटवायची हे यांना माहित आहे. त्यामुळे आगामी काळात मनुस्मृती आणून संविधान नष्ट करू इच्छिणाऱ्या भाजपा महायुतीला हद्दपार करा.

तसेच उध्दव ठाकरे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख वैभव उगळे म्हणाले, तालुक्यात दोन नंबर वाल्यांचे जाळे पसरवले असून तरुण पिढी बरबाद करण्याचे काम होत आहे. विरोधी आमदाराला भगवा चालत नाही. भाजपाचा झेंडा घ्यायला का लाज वाटते? त्यांचा पाठिंबा कसा चालतो? त्यांना याचे उत्तर द्यावे लागेल. विशिष्ट



समाजाची मते लमिळवण्यासाठीच झेंडे न घेता अपक्ष लढवित आहेत. आजच्या गर्दीने गणपतराव पाटील आमदार होणार हे निश्चित झाले आहे. यावेळी माजी जि. प. समाज कल्याण सभापती स्वाती सासणे यांनी लाडकी बहीण योजनेतून मिळाले ल्या पंधराशे रुपये वरून महिलांना धमकी देणाऱ्या खासदार आणि महायुती सरकारचा निषेध केला. महाविकास आघाडीला महिलांच्या सुरक्षिततेसाठी आणि लसन्मानासाठी निवडून देण्याचे आवाहन केले.

यावेळी उमेदवार गणपतराव पाटील म्हणाले, तालुक्यातील महापूर परिस्थितीवर कायमस्वरूपी उपाययोजना करणे,पंचगंगा प्रदूषण मुक्ती, जमीन क्षारपड मुक्ती, महिला सक्षमीकरण, युवकांना रोजगार, औद्योगिक वसाहतीची निर्मिती अशा विविध माध्यमातून तालुक्याचा विकास करण्याची माझी दृष्टी आहे.

# साताऱ्यात प्राचार्य शंकरराव उर्फ बापूसाहेब उनउने राष्ट्रीय बोली भाषा कवितालेखन स्पर्धेचे आयोजन

सातारा : येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ सातारा चे घटक महाविद्यालय असलेल्या छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये मराठी विभागाने प्राचार्य शंकरराव उर्फ बापूसाहेब उनउने राष्ट्रीय मराठी व कोकणी भाषेतील बोलीभाषा खुल्या कविता लेखन स्पर्धेचे आयोजन केलेले असून यास्पर्धेसाठी मराठीच्या विविध बोली भाषेतून कोल्हापुरी, चंदगडी, मराठवाडी, वऱ्हाडी, बेळगावी, मालवणी. मॉरिशस मराठी, झाडीबोली, तंजावरी मराठी, बागलाणी, नंदुरबारी, डोंगरागी, जामनेरी, खान्देशी, अहिराणी, माणदेशी, आदिवासी भाषा, तसेच कोंकणी या स्वतंत्र भाषेतील विविध बोली भाषेतील कवितांचा या स्पर्धेत समावेश करण्यात येईल तरी बोली भाषेतून कविता पाठवून द्याव्यात असे आवाहन छत्रपती शिवाजी कॉलेजचे मराठी विभाग प्रमुख व कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाच्या भाषा मंडळांचे प्रभारी संचालक प्रा.डॉ.सुभाष वाघमारे व यांनी केले आहे.प्राचार्य डॉ.राजेंद्र मोरे यांच्या मार्गदर्शनाने सदर स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे.



मराठी बोली भाषेचे जतन व संवर्धन करण्याच्या उद्देशाने ही स्पर्धा घेतली जात असल्याचे सांगून प्रा.डॉ. सुभाष वाघमारे पुढे म्हणाले की या स्पर्धेत महाराष्ट्र, गोवा, महाराष्ट्राचे सीमेवर असलेल्या राज्यातील मराठी भाषिक तसेच भारतात व भारताबाहेर असलेले मराठीचे तसेच कोकणी भाषेच्या विविध बोलीत लिहिणारे कवी सहभागी होऊ शकतील. कवितेच्या कोणत्याही प्रकारात बोली भाषेतून कविता लेखन करता येईल. कवितेची शब्द मर्यादा १०० ते १५० शब्द इतकी असेल. कवितेस विषयाचे बंधन नाही.एक कवी एक अथवा अनेक कविता पाठवू शकेल, प्रत्येक कवितेसाठी रुपये १०० /- इतके नोंदणी शुल्क पाठवणे आवश्यक राहील.आलेल्या सर्व बोली भाषेतील कवितांचा स्पर्धेत समावेश केला जाईल. प्रमाणभाषेत कविता न पाठवता बोली भाषेतच कविता पाठवणे आवश्यक आहे.स्पर्धेसाठी आलेल्या मराठी बोलीतील कवितांचे परीक्षक यांचेकडून मूल्यमापन केले जाईल. परीक्षक यांनी दिलेला निकाल अंतिम मानला जाईल.बोलीभाषेतून लिहिलेल्या व परीक्षकांनी अधिक गुण देऊन उत्कृष्ट ठरविलेल्या पहिल्या तीन कवितांना अनुक्रमे प्रथम क्रमांकास रु.५००० /- द्वितीय क्रमांकास ४००० रुपये व , तृतीय क्रमांकास ३००० रुपये असे पारितोषिक असेल. तसेच उत्तेजनार्थ दहा पारितोषिके असून परीक्षकांनी ठरविलेल्या १० कवितांना प्रत्येकी ५०० रुपये पारितोषिक देण्यात येईल. या सर्व पारितोषिक विजेत्या कवींचा पारितोषिक वितरण समारंभात प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात येईल. या खेरीज स्पर्धेसाठी आलेल्या प्रत्येक कवीच्या एका कवितेची निवड करून एक प्रातिनिधिक कवितासंग्रह प्रकाशित करण्यात येईल. या कविता संग्रहात कोणती कविता प्रकाशित करावयाची याचे अधिकार संपादक प्रा.डॉ. सुभाष वाघमारे यांना असतील.कवींनी आपल्या कविता स्व हस्ताक्षरात लिहून पाठवून द्याव्यात तसेच आपल्या कविता स्व रचित असल्याचे प्रतिज्ञापत्र कवितेसोबत पाठवणे आवश्यक आहे. तसेच पोस्टाने पाठविणाऱ्या कविता देखील मराठी कोकिळा लिपीत टाईप करुन ती प्रा.डॉ.सुभाष वाघमारे यांचे मोबाईल नंबर ९८९०७२६४४० या व्हॉटस् अप क्रमांकावर पाठवून द्याव्यात.

कवितेची स्व हस्ताक्षरातील प्रत प्रा.डॉ.सुभाष वाघमारे मराठी विभाग प्रमुख,छ.शिवाजी कॉलेज, सातारा ४१५००१या पत्त्यावर पोस्टाने अगर कुरियरने २० नोव्हेंबर २०२४ अखेरपर्यंत पोहचेल अशी पाठवून द्यावी.. एका कवितेसाठी फक्त रुपये १०० /- इतके प्रवेश शुल्क ९८९०७२६४४० या मोबाईल नंबरवर फोन पे, किंवा गुगल पे द्वारा पाठवून द्यावेत.

# आई-बाबा मतदान करायचं हं..!

## मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी 'योजना शिक्षण'चा पुढाकार!

**मसूर/प्रतिनिधी:-** राज्यात २० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुकीसाठी मतदान होत आहे. मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी योजना शिक्षण संचालनालयाने शालेय विद्यार्थी व नवसाक्षर यांच्यासाठी व्हिडिओ निर्मिती आणि कौटुंबिक पत्रलेखन उपक्रम आयोजित केले आहेत. योजना शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी सर्व जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांना याबाबत पत्राद्वारे याबाबत सूचना दिल्या आहेत.

मागील लोकसभा निवडणुकीत राष्ट्रीय सरासरीपेक्षा महाराष्ट्रात कमी मतदान झाल्याचे दिसून आले. त्यामुळे राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी राज्यातील सर्व अधिकाऱ्यांना मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी प्रयत्न करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या पार्श्वभूमीवर योजना शिक्षण संचालनालयाने आयोजित केलेले दोन्ही उपक्रम अनोखे असेच आहेत.

याबाबत राज्य योजना शिक्षण उपसंचालक राजेश क्षीरसागर यांनी सांगितले की,दिनांक १७ मार्च २०२४ रोजी झालेल्या परीक्षेत ४ लक्ष २५ हजार ९०६ इतके असाक्षर आता नवसाक्षर झाले आहेत. साक्षरता कार्यक्रमात असाक्षरांना मतदान प्रक्रियेविषयी सचित्र माहिती देऊन साक्षर करण्यात आले आहे. या नवसाक्षरांनी मतदान प्रक्रियेत शंभर टक्के मतदानाचा अधिकार बजावून कुटुंबातील इतर सदस्यांना व आप्त नातेवाईकांनाही मतदानासाठी प्रेरित करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नवसाक्षरांसह राज्यातील इयत्ता पाचवी ते बारावी मधील सर्व विद्यार्थ्यांनी कौटुंबिक पत्रलेखन व व्हिडिओ तयार करून सर्व पात्र मतदारांना मतदान करण्याचे आवाहन करण्याविषयी सुचित केले आहे. शाळा, तालुका, जिल्हा स्तरावर या दोन्ही उपक्रमात सर्वोत्कृष्ट प्रत्येकी पाच पत्रे आणि व्हिडिओ निर्मितीसाठी प्रशस्तीपत्रे निवडणूक आचारसंहिता संपल्यानंतर वितरित करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

> कौटुंबिक पत्रलेखन सध्याच्या काळात मागे पडले आहे, त्याचा सराव व्हावा आणि मतदान जागृती व्हावी असे दोन्ही उद्देश ठेवून पत्रलेखन व व्हिडिओ निर्मिती या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.
> –राजेश क्षीरसागर, राज्य शिक्षण उपसंचालक योजना, पुणे

उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रम असाक्षरांमध्ये केवळ पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान विकसित करणे एवढ्या पुरता हा कार्यक्रम मर्यादित नसून महत्त्वपूर्ण जीवन कौशल्ये, मूलभूत शिक्षण, व्यावसायिक कौशल्ये विकसित करणे व त्यांना निरंतर शिक्षण देणे या प्रमुख उद्दिष्टांचाही नवभारत साक्षरता कार्यक्रमात समावेश आहे. उल्लास मार्गदर्शक पुस्तिका क्रमांक २ मध्ये मतदान प्रक्रियेची सविस्तर व सचित्र माहिती देण्यात आली आहे. लोकशाहीच्या सुदृढीकरण व बळकटीकरणासाठी सर्व प्रौढ नागरिकांनी मतदान करणे गरजेचे आहे. आपले मत लोकशाहीचा प्राण आहे! ही बाब सर्व प्रौढ नागरिकांमध्ये बिंबवणे आवश्यक आहे.



आपले मत लोकशाहीचा प्राण आहे! अशी जागृती करताना साक्षरता मोहिमेत राष्ट्रीय पातळीवर दखल घेतलेल्या नवसाक्षर सुशीला क्षीरसागर व स्वयंसेविका रुचिता क्षीरसागर.

कौटुंबिक पत्रलेखन द्वारे विद्यार्थी आई-वडिलांना घरातच समक्ष पत्र देऊन तर इतर नातेवाईकांना टपालाद्वारे पत्र पाठवून मतदान करण्याबाबत हट्ट धरतील, नव साक्षरांनीही स्वयंसेवकांच्या मदतीने पत्र लिहिणे अपेक्षित आहे. शालेय विद्यार्थी व नव साक्षर यांनी मतदानाचे महत्त्व व्हिडिओच्या माध्यमातून पटवून देणे अपेक्षित आहे.याबाबत आचारसंहिताचे उल्लंघन होणार नाही याचीही दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.



# डॉ. जी.एस. पट्टेबहादूर उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्काराने सन्मानित

## बाळासाहेब देसाई महाविद्यालयास उत्कृष्ट एन.एस.एस. युनिट पारितोषिक

**पाटण/प्रतिनिधी:** बाळासाहेब देसाई कॉलेज पाटण मधील अर्थशास्त्र विभागातील प्रा.डॉ. गजानन पट्टेबहादूर यांना त्यांच्या राष्ट्रीय सेवा योजनेमधील योगदानाबद्दल शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या वतीने कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते सातारा जिल्हास्तरीय उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. तसेच शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर राष्ट्रीय सेवा योजना २०२२ – २३ साठीचे उत्कृष्ट राष्ट्रीय सेवा योजना युनिट म्हणून बाळासाहेब देसाई महाविद्यालयास जिल्हास्तरीय पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचे प्रकुलगुरू डॉ.पी.एस. पाटील, रजिस्टार डॉ.व्ही.एन.शिंदे, एन.एस.एस. विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले उपस्थित होते.

बाळासाहेब देसाई महाविद्यालयाने राष्ट्रीय सेवा योजनाच्या माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रम राबवून युवकांच्या मनामध्ये श्रमसंस्कार रुजवत संस्कारशील नागरिक बनविण्याचा प्रयत्न करून शिवाजी विद्यापीठात आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे. महाविद्यालयाने राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून अनेक उपक्रम घेतले आहेत या उपक्रमांची दखल घेऊन शिवाजी विद्यापीठाकडून सन २०२२ – २३ चा उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी म्हणून डॉ. पट्टेबहादूर यांना व उत्कृष्ट राष्ट्रीय सेवा योजना युनिट म्हणून बाळासाहेब देसाई महाविद्यालयास जिल्हास्तरीय पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी कार्यक्रम अधिकारी डॉ. भरत जाधव, प्रा. लक्ष्मण गणगे, प्रा.विशाल कांबळे,प्रा. श्रीगणेश गायकवाड हे उपस्थित होते. डॉ. जी. एस. पट्टेबहादूर हे सलग पाच वर्षे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी म्हणून कार्यरत आहेत ते सातारा जिल्हा विभागीय समन्वयक म्हणूनही काम पाहत आहेत. त्याचबरोबर त्यांनी आव्हान शिबिरामध्ये शिवाजी विद्यापीठास प्रथम क्रमांकाचे पारितोषिक ही मिळवून दिले आहे. या यशाबद्दल त्यांचे, महाविद्यालयाने, संस्था चालकांनी अभिनंदन केले.

# ब्रिटिशकालीन किचकट व कालबाह्य कायदे बदलले पाहिजेत

**शिराळा/प्रतिनिधी:** ब्रिटिशांनी किचकट कायदे केले तेच कायदे आपण अजूनही पाळत आहोत. हे कालबाह्य झालेले कायदे बदलले पाहिजेत तसेच त्यात बदल केले पाहिजेत, असे मत ज्येष्ठ पत्रकार भाऊ तोरसेकर यांनी मांडले.

शिराळा येथील व्यापारी असोसिएशन सभागृहात आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. महाराष्ट्र प्रदेश भाजपच्या किसान सेलचे प्रदेश उपाध्यक्ष जयसिंगराव शिंदे, वसंतराव यादव यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. तोरसेकर म्हणाले, ब्रिटिशांनी आपल्याला उल्लू बनवण्यासाठी किचकट कायदे केले. या जोखडातून मुक्ती मिळविण्यासाठी ठोस कायद्यांची अंमलबजावणी झाली पाहिजे. स्वातंत्र्य मिळण्यापेक्षा ते स्वातंत्य माणसाच्या आयुष्यात कसे आले ? हे आपल्यासाठी महत्त्वाचे आहे. कायद्याने खऱ्या अर्थाने अन्याय सहन करण्याची ताकद दिली. हेच कायदे आपल्या मुलतत्वावर उठले आहेत. त्याला बदलण्याची गरज आहे. चुकीच्या माहिती आधारे निष्कर्ष काढल्यास ती प्रक्रियाच चुकीची ठरते असे ते म्हणाले.

या कार्यक्रमास सम्राट शिंदे, बसवेश्वर शेटे, राजू पाटील, दर्शन जोशी, अनिता धस, वैभवी कुलकर्णी, अखिलेश पाटील, अक्षय पाटील, शिवकुमार आवटे, मोहन जिरंगे उपस्थित होते. श्रेयस महाजन यांनी स्वागत केले तर आभार शुभम देशमुख यांनी मानले.

# २३ नोव्हेंबरपर्यंत शस्त्र व जमावबंदी

**सातारा/प्रतिनिधी:** सातारा जिल्ह्यात कोणताही अनुचित प्रकार अगर कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम (सुधारणा अध्यादेश) महाराष्ट्र पोलीस अधिनियम २०१४ चे कलम ३७ (१) (३) अन्वये दिनांक २३ नोव्हेंबर २०२४ रोजीच्या रात्री १२ वाजेपर्यंत शस्त्र व जमाव बंदी आदेश जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डूडी यांनी जारी केला आहे.

ज्या लोकांनी शांततेचा मार्गाने एकत्र जमून कोणताही कार्यक्रम साजरा करायचा असेल त्याचवेळी पोलीस विभागाची (पोलीस अधिक्षक/संबंधित पोलीस स्टेशनचे प्रभारी पोलीस निरीक्षक/उपनिरीक्षक) यांची लेखी पूर्व परवानगी घेतली असेल तर त्यांना सदरचा आदेश लागू होणार नाही, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# पूरस्थिती, कोरोना काळात लाटकर कुठं होते?

## सत्यजित उर्फ नाना कदम यांची लाटकर यांच्यावर टीका

**कोल्हापूर/प्रतिनिधी:** फिल्मी स्टाईलने भाषण करून जनतेचे मनोरंजन करणारे काँग्रेसचे पुरस्कृत उमेदवार पूरस्थिती आणि कोरोना काळात कुठं होते. संकटसमयी जनतेला वाऱ्यावर सोडून कुठे लपले होते याचा खुलासा करावा. सामाजिक, विकासात्मक कामांच्या आधारावर अपेक्षित निवडणूक मुद्दामहून भावनिक केली जात आहे. पण, विरोधकांच्या हा डाव जनतेने वेळीच ओळखला असून, संकटसमयी कुटुंबप्रमुखाप्रमाणे जनतेच्या पाठीशी उभे राहणाऱ्या राजेश क्षीरसागर यांना लाखोंचे मताधिक्य देतील, असा विश्वास माजी नगरसेवक सत्यजित उर्फ नाना कदम यांनी व्यक्त केला. महायुती उमेदवार राजेश क्षीरसागर यांच्या प्रचारार्थ कदमवाडी परिसरात प्रचारफेरीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रचार फेरीस महिलांचा उदंड प्रतिसाद लाभला.

ते पुढे म्हणाले कि, राजेश क्षीरसागर हे देखील सर्वसामान्य कार्यकर्तेच आहेत.



टोल, एल.बी.टी. थेट पाईपलाईन असे अनेक प्रश्न क्षीरसागर यांच्या पुढाकारानेच मार्गी लागले आहेत. त्यामुळे जनतेच्या प्रश्नांची जाणीव त्यांना आहे कारण ते सदैव जनतेमध्येच आणि जनतेसाठीच उपलब्ध असतात. पण, विरोधकांकडे प्रचारासाठी मुद्देच नसल्याने त्यांनी सामान्य कार्यकर्त्याचे कार्ड बाहेर काढले आहे. अशा या फसव्या प्रचारास जनता बळी पडणार नाही. राजेश क्षीरसागर यांच्या कामाची तुलना अशक्य आहे. कोरोनामध्ये गोरगरीब आणि सामान्य नागरिकांना जीवनावश्यक वस्तूंच्या वाटपाच्या मदतीसह प्रशासनावर नियंत्रण ठेवून रुग्णसेवेची भूमिका चोखपणे बजावली. पूरस्थितीत बाधित नागरिकांना मदत मिळवून देण्यापासून स्वत: मदतीसाठी पाण्यात उतरून सामान्य कार्यकर्ता कसा असावा याचे उदाहरण दिले. लोकप्रतिनिधी म्हणून आवश्यक असणारे सर्व गुण राजेश क्षीरसागर यांच्या असल्याने त्यांची लोकप्रियता अखंड वाढत आहे. परंतु, विरोधक काँग्रेस पुरस्कृत उमेदवार पूरस्थिती, कोरोनात समाजकार्यात होते काय? हा संशोधनाचा विषय आहे. त्यामुळे सामान्य कार्यकर्ता असलेल्या राजेश क्षीरसागर यांना प्रचंड बहुमतांनी विजयी करण्याचे आवाहन केले.

यावेळी माजी नगरसेवक मारुती माने, वैभव माने, स्वरूप कदम, विनय वाणी, यशवंत उर्फ बंडा माने, अनमोल तोरस्कर, बापू खोत, कुणाल क्षीरसागर, संग्राम दुर्गुळे, प्रसन्न माने, अक्षय कुंभार आदी उपस्थित होते.

# तुळजापूर नळदुर्गसह तालुक्याचा विकास झाला पाहिजे हेच ध्येय

## राणा पाटील ;तुळजापूर शहरात महायुतीचे रेकॉर्ड ब्रेक शक्ती प्रदर्शन

**नळदुर्ग/प्रतिनिधी:** तुळजाभवानी देवीच्या तीर्थक्षेत्राचा तुळजापूर नळदुर्ग सह तालुक्याचा कायापालट हेच आपले ध्येय आहे. जगदंबेच्या आशीर्वादाने मागील पाच वर्षांत तुळजापूर मतदारसंघाची सेवा करण्याचे भाग्य लाभले. तीर्थक्षेत्र तुळजापूर रेल्वेच्या राष्ट्रीय नकाशावर नोंदविता आले. जागतिक दर्जाचे धार्मिक पर्यटन तुळजापूर शहरात विकसित करण्यासाठी दोन हजार कोटी रूपयांचा विकास आराखडा अंतिम करण्यात आला आहे. रोजगार निर्मितीकडे आपले विशेष लक्ष आहे. तुळजापूरचा कायापालट होत आहे. जिल्ह्याचाही सर्वार्थाने कायापालट करण्यासाठी आपल्या सर्वांचे सहकार्य आणि सोबत महत्वपूर्ण असल्याचे आवाहन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले .

तुळजाभवानी मंदिरासह परिसरात विकासकामे करून, पर्यटक व भाविकांच्या संख्येत दुपटीने वाढ होण्यासाठी आवश्यक ती विकासकामे



सुरू करण्यात आली आहेत. त्यामुळे स्थानिक व्यापार्यांना आणखी पर्यायी व्यवसाय करून आपले उत्पन्न दुपटीने वाढविता येणार आहे. तुळजापूरकरांना विश्वासात घेवूनच सर्व विकासकामे करायचे आहेत. ठाकरे सरकारने रेल्वे प्रकल्पासाठी एक रूपयाही दिला नाही, अडीच वर्षे काम थांबले होते. त्यासाठी आपण परिवहन मंत्र्यांवर हक्कभंग आणला. शेवटी साडेचारशे कोटी रूपयांचा निधी महायुती सरकारनेच उपलब्ध करून दिला आणि रेल्वेमार्गाचे काम चालू झाले. केंद्र सरकारच्या प्रशाद योजनेसाठी तीर्थक्षेत्र तुळजापूरचा विकास आराखडा तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने पाठवावा, यासाठी आपण पाठपुरावा केला होता. मात्र ठाकरे सरकारने ऐकले नाही.

शेतकर्यांना कर्जमाफी, वीजबिल माफी महायुती सरकारनेच दिली. मुलींना मोफत उच्च शिक्षण दिले, लाडक्या बहिणींना महिन्याला दीड हजार रूपये लाभाची योजना सुरू केली. त्यामुळे विरोधकांना अडीच वर्षात महायुती सरकारने काय केले, हे विचारण्याचा नैतीक अधिकार राहिला नाही. नळदुर्गला बसवसृष्टी उभारली जात आहे, तुळजापुरात अहिल्यादेवी होळकरांचे स्मारक, बौध्द विहार, शादीखान्याचे भूमिपूजन केले. हा फक्त विकासाचा ट्रेलर आहे. विकासाचा पिक्चर अजून बाकी आहे आणि त्यासाठी सर्वांची साथ हवी असल्याचे मत आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केले.

# जात-धर्म न बघता सगळ्यांना सोबत घेऊन जाण्याची आमची भूमिका

## शंभूराज देसाई यांची ग्वाही



**पाटण/प्रतिनिधी:** विकासकामे करताना मतदारसंघात आम्ही कधीही दुजाभाव केलेला नाही. गेल्या ४० वर्षांचा विकासाचा बॅकलॉग गेल्या अडीच वर्षांत भरून काढला. मतदारसंघात जलजीवन मिशनअंतर्गत पाणीपुरवठा योजना राबवल्या. पूर संरक्षक भिंती विविध ठिकाणी बांधल्या. जात-धर्म न बघता सगळ्यांना सोबत घेऊन पुढे जाण्याची आमची भूमिका आहे, असे सांगत मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी याहीवेळी आमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहा, असे आवाहन शंभूराज देसाई यांनी मतदार बंधू-भगिनींना केले. सोमवारी सुपने मंडल विभागात शंभूराज देसाई यांचा गावभेट दौरा संपन्न झाला. त्यावेळी ते बोलत होते.

पाटण विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक विभागातील मतदारांशी शंभूराज देसाई गावभेट दौऱ्यांच्या माध्यमातून थेट संवाद साधत आहेत. मंगळवारी त्यांनी सुपने मंडलातील भोळेवाडी, म्होप्रे, खडीवस्ती म्होप्रे, बेलदरे, वसंतगड, पश्चिम सुपने, आबाईचीवाडी, पाडळी, केसे, डेळेवाडी, आरेवाडी, गमेवाडी, उत्तर तांबवे, साजुर या गावांना भेटी देऊन उपस्थित कार्यकर्ते, पदाधिकारी व मतदार बंधू-भगिनींशी संवाद साधला. यावेळी संबंधित गावांतील शिवसेना-महायुतीचे कार्यकर्ते, पदाधिकारी, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, बुथप्रमुख, तसेच मतदार बंधू-भगिनींनी शंभूराज देसाई यांच्या दौऱ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यावेळी शंभूराज देसाई म्हणाले की, गेल्या पाच वर्षांत साडेचार कोटी रुपये निधीची विकासकामे उत्तर तांबवे येथे, तर साजुर गावात ०६ कोटी ६० लाख रुपये, पाडळी येथे ०४ कोटी ४३ लाख रुपये, केसे येथे ०३ कोटी रुपये, बेलदरे गावात ०४ कोटी ६२ लाख रुपये, भोळेवाडी येथे ०१ कोटी ५७ लाख रुपये आणि म्होप्रे येथे ०५ कोटी ६९ लाख रुपये निधीची विकासकामे केली आहेत. तसेच येत्या काळात उत्तर तांबवेमध्ये पाणीपुरवठा योजना राबविण्याचा संकल्प असल्याचे शंभूराज देसाई यांनी यावेळी सांगितले. पुढे ते म्हणाले की, काही उमेदवार मंडळी मतदारांना पाच वर्षांत एकदाही भेटायला येत नाहीत. अशा उमेदवारांपासून सावध राहा. आता विरोधक निवडणुकीपुरते येतील, पण त्यांच्या आमिषाला बळी पडू नका. आम्ही केलेली विकासकामे डोळ्यांसमोर ठेवून मतदान करा. विकासकामांसाठी आमच्याकडे यायला ग्रामस्थांना कुणाही मध्यस्थाची गरज पडत नाही. ग्रामस्थ आणि आमच्यात थेट संवाद होतो, याचा अनुभव मतदारसंघातील जनता घेत आहे. मतदारसंघातील प्रत्येक गाव समृद्ध झाले पाहिजे, असा आमचा संकल्प आहे. तो पूर्ण करण्यासाठी याहीवेळी आम्हाला साथ द्या, असे आवाहन शंभूराज देसाई यांनी यावेळी केले.



# कराड आरटीओ कार्यालय व कराड दक्षिण स्वीप पथकाच्या माध्यमातून मतदान जनजागृती रॅली

**कराड/प्रतिनिधी:** कराड आरटीओ कार्यालय व कराड दक्षिण स्वीप पथक यांच्या संयुक्त विद्यमाने विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान जागृती करण्यासाठी मोटार वाहन रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

या रॅलीत आरटीओ कार्यालयाची तब्बल २५ वाहने सहभागी झाली होती. सहाय्यक उपप्रादेशिक परिवहन अधिकारी वृंदा गुरावे, मोटार वाहन निरीक्षक चैतन्य कणसे यांनी या रॅलीला झेंडा दाखवून रॅलीची सुरुवात केली. यावेळी कराड दक्षिण स्वीप पथकाचे नोडल अधिकारी सौरभ करपे, सुनील परीट, आनंदराव जानुगडे, ऋषिकेश पोटे, सचिन चव्हाण उपस्थित होते. कराड आरटीओ कार्यालयापासून सुरू झालेली ही रॅली मतदान जागृती करत जुन्या पुलावरून कराडमध्ये प्रविष्ट झाली. यानंतर दत्त चौक, आझाद चौक, चावडी चौक, कन्या शाळा, कृष्णानाका मार्गे ही रॅली मतदान जागृती करत परत दत्त चौकात आली, आणि नंतर कोयना जुन्या पुलावरून आरटीओ कार्यालयाकडे गेली.

आरटीओ कार्यालय कराड व स्वीप पथक यांच्या माध्यमातून या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मोटार वाहन निरीक्षक शिरीष पोकळे, सुरेश आगवणे, सागर विश्वासराव, समीर सावंत, प्रसन्ना पवार, तृप्ती निकम, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक रजनी पाटोळे, शिवानी सगरे, ज्योती घुले, सचिन बिटले, सौरभ कोळी, विनोद सूर्यवंशी, भारत गोरड, अमोल कदम यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते. या मोटार रॅलीत कराड, पाटण ड्रायव्हिंग स्कूलची वाहने उत्स्फूर्तपणे सहभागी झाली होती.

# खा.धनंजय महाडिक यांच्याबद्दल चुकीचे वक्तव्य करणाऱ्या उद्धव ठाकरे आणि अलका लांबा यांच्यावर कारवाई करा

## भाजप महिला मोर्चाची मागणी



**कोल्हापूर/प्रतिनिधी:** खासदार धनंजय महाडिक यांच्याविषयी चुकीचे आणि प्रक्षोभक वक्तव्य करणार्या माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि काँग्रेस नेत्या अलका लांबा यांच्यावर पोलिस आणि निवडणूक आयोगाने कारवाई करावी, अशी मागणी भाजप महिला मोर्चाच्यावतीने करण्यात आली आहे. मागणीचे निवेदन, अपर पोलिस अधीक्षक जयश्री देसाई यांना देण्यात आले आहे. उद्धव ठाकरे आणि अलका लांबा यांच्यावर कारवाई होईपर्यंत स्वस्थ बसणार नाही, असा इशारा यावेळी देण्यात आला.

भारतीय जनता पार्टीच्या महिला मोर्चाच्यावतीने, कोल्हापूरच्या अपर पोलिस अधीक्षक जयश्री देसाई यांना आज निवेदन देण्यात आले आहे. काँग्रेस नेत्या अलका लांबा यांनी खासदार धनंजय महाडिक यांच्याविषयी अवमानकारक आणि चुकीचं वक्तव्य केले आहे. तर वाशीम जिल्ह्यातील प्रचार सभेत, उद्धव ठाकरे यांनी खासदार धनंजय महाडिक यांच्याबद्दल पातळी सोडून टीकाटिपणी केली. उद्धव ठाकरे यांच्या चिथावणीखोर आणि प्रक्षोभक वक्तव्याची दखल घेऊन त्यांच्यासह अलका लांबा यांच्यावर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी भाजप महिला मोर्चाच्यावतीनं करण्यात आली आहे. खासदार धनंजय महाडिक आणि सौ. अरुंधती महाडिक यांनी गेल्या १८ वर्षांत महिला सक्षमीकरणासाठी मोठं योगदान दिलंय. महिलांच्या कलागुणांना वाव मिळवून देण्याबरोबरच, त्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी भागीरथी महिला संस्थेच्यावतीने भरीव काम झालंय. महाडिक परिवाराकडून महिलांचा नेहमीच सन्मान केला जातोय.

त्यामुळे खासदार महाडिक यांच्या वक्तव्याचा विपर्यास करून, प्रक्षोभक आणि चुकीचं वक्तव्य करणार्या ठाकरे आणि लांबा यांच्यावर कारवाई होईपर्यंत भाजप महिला मोर्चा स्वस्थ बसणार नाही, असा इशारा देण्यात आला. यावेळी रुपाराणी निकम, तेजस्विनी पार्टे, रिमा पालकर, शीतल तिरुके, शारदा पोटे, सीमा पालकर, प्रणोती पाटील, रुपाली कुंभार, रंजना शिर्के, सरिका हारूगले, अलका जावीर, जिया अभंगे, रंजना रणवरे, हेमा उलपे, राजश्री उलपे, वंदना बंबलवाड, छाया ननवरे, अश्विनी गोपुगडे, शारदा देसाई यांच्यासह महिला उपस्थित होत्या.

# वाई मतदारसंघात रामकृष्ण हरी वाजवा तुतारी ची ललकारी

## वाई खंडाळ्यातील प्रचार सभा ;कोपरा सभा आणि रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**वाई/प्रतिनिधी:** वाई, खंडाळा महाबळेश्वर विधानसभा मतदारसंघाच्या महाविकास आघाडीच्या उमेदवार सौ. अरुणादेवी पिसाळ यांच्या तुतारी वाजविणारा माणूस या चिन्हाचा जोर वाढत आहे. खंडाळा तालुक्यातील भाद गटात आणि खंडाळा शिरवळ आणि लोणंद या मुख्य गावे आणि तालुक्यातील गावांना प्रत्यक्ष जाऊन गावभेटी दिल्या. अरुणावहिनींना वाई मतदारसंघाच्या पहिल्या महिला आमदार बनविण्यासाठी मतदारांनी ही निवडणूक हातात घेतली आहे.

यावेळी बोलताना सौ. अरुणादेवी पिसाळ म्हणाल्या, मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासकामांचा डांगोरा पिटणाऱ्या आमदारांनी कोणता मोठा प्रकल्प मतदारसंघात आणला. किती तरुणांना रोजगार उपलब्ध करून दिला?कोणती संस्था उभी केली हे सांगण्याची वेळ आली आहे.

> विद्यमान आमदार जो गट पक्ष संघटना त्यांना पाठिंबा देतात त्यांना आमदार निकामी करतात. या तिघा भावाच्या गटबाजी आणि फोडाफोडीच्या राजकारणाला खंडाळा तालुक्यातील जनता कंटाळली आहे. उदयनराजेंच्या लोकसभा निवडणूकी वेळी आमदार गट कुणाचे काम करत होता हे जगजाहीर आहे.ते महायुतीची धर्म पाळत नसतील तर आम्हीही पाळणार नाही.१५ वर्षे नाकर्तेपणाला कंटाळून आम्ही अरुणावहिनींच्या विजयासाठी झटत आहोत.
>
> हर्षवर्धन शेळके पाटील भाजपा लोणंद



रमेश धायगुडे पाटील म्हणाले, या मतदारसंघाला विकासाचे व्हिजन असणाऱ्या प्रतिनिधींची गरज सौ. अरुणादेवीच्या रूपाने पूर्ण होणार आहे. मतदासंघात आमदार विरोधी सुप्त लाट आहे. सगळं मलाच आम्हालाच पाहिजे हा त्यांचा अट्टहास स्वाभिमानी मतदारांच्या जिव्हारी लागली असून या मतदारसंघात महाविकास आघाडीचा विजय निश्चित आहे.

यावेळी पाडेगाव, बाळूपाटलाचीवाडी, पिंपरे, आंदोरी, मरीआईचीवाडी, बावकलवाडीवाघोशी, कराडवाडी, वाठार कॉलनी शेडगेवाडी, भादे, तोडलं, लोणी भोळी मोरवे या गावात मतदारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# महाराष्ट्र राज्यातील सगळे मोठे उद्योग गुजरातलाच कसे गेले ?

## राजवर्धन पाटील

**इस्लामपूर/प्रतिनिधी:** आपल्या राज्यातील लाखो युवकांच्या हाताला काम देणारे अनेक मोठ-मोठे उद्योग गुजरातलाच कसे गेले? याचा विचार आपल्या राज्यातील जनता निश्चितच करत आहे. भाजपा महायुतीच्या सरकारने मोदी-शहा आणि गुजरातचे मांडलिकत्व पत्करल्याने महाराष्ट्र राज्याचे मोठे नुकसान झाले आहे, असा आरोप युवा नेते राजवर्धन जयंतराव पाटील (भैय्या) यांनी इस्लामपूर येथील सभेत बोलताना केला. आ.जयंतराव पाटील यांचा विजय निश्चित असून राज्यात महाविकास आघाडीचेच सरकार येणार, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

इस्लामपूर शहरातील मंत्री कॉलनी,बुरुड गल्ली,रामोशी गल्ली व शास्त्रीनगर येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष, महाविकास आघाडीचे उमेदवार आ.जयंतराव पाटील यांच्या प्रचारार्थ जाहीर कोपरा सभेत ते बोलत होते. शहराध्यक्ष शहाजी पाटील, माजी नगराध्यक्ष अँड.चिमण डांगे, पै.भगवान पाटील, अरुणादेवी पाटील, खंडेराव जाधव, अँड. धैर्यशिल पाटील, अरुण कांबळे, सुरेंद्र पाटील, संदीप पाटील, पुष्पलता खरात, दिग्विजय पाटील, राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे राजेंद्र शिंदे, अँड. आर.आर. पाटील, अँड. आकीब जमादार, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शकील सय्यद, उदय सरनोबत, आपचे गजानन पाटील प्रामुख्याने उपस्थित होते.

राजवर्धन पाटील पुढे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरत लुटून इतिहास घडविला. मात्र भाजपाने शिवसेनेचे आमदार फोडून त्यांना सुरतला नेले आणि मराठी माणसाने उभा केलेला पक्ष फोडला. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षही फोडला. राज्यातील जनतेने त्यांना लोकसभा निवडणुकीत हिसका दाखविला. ही दोन व्यक्तींमधील लढाई नसून दोन विचारामधील लढाई आहे. समोरच्या बाजूला गुजरात धार्जिण्य,पक्ष बदलू,गद्दार आहेत. तर आपल्या बाजूला विचार, तत्व, स्वाभिमानाचे,तसेच महाराष्ट्र व सामान्य माणसाच्या हिताचे राजकारण करणारे नेते आहेत. शेवटी विजय सत्याच होतो.

शहाजी पाटील म्हणाले, आ.जयंतराव पाटील यांनी या शहरातील घरपट्टी कधीही वाढू दिली नाही. मात्र अपघाताने नगराध्यक्ष झालेल्यांनी या शहरातील घरपट्टी वाढविण्या चे पाप केले आहे.

पै.भगवान पाटील म्हणाले,जे विधान सभेला उमेदवार म्हणून उभा आहेत, त्यांनी इस्लामपूरचे नगराध्यक्ष म्हणून गेल्या पाच वर्षात केलेले एक ठळक काम सांगावे.

शकील सय्यद म्हणाले, उद्याच्या महाराष्ट्राचे नेतृत्व करण्याची क्षमता आ.जयंतराव पाटील यांच्यामध्ये आहे. त्यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करून राज्याचे मुख्यमंत्री होण्यास आशिर्वाद द्या.



इस्लामपूर येथील जाहीर कोपरा सभेत बोलताना युवा नेते राजवर्धन पाटील (भैय्या). समवेत शहाजी पाटील, अरुणादेवी पाटील,दादासो पाटील,शकील सय्यद,गजानन पाटील,दीपा देशपांडे, पुष्पलता खरात,मालन वाकळे व मान्यवर.

सौ.अरुणादेवी पाटील म्हणाल्या,आ. जयंतराव पाटील हे विकासाची दृष्टी असणारे नेतृत्व आहे. त्यांनी तालुक्यात विकास कामां चा डोंगर उभा केला आहे. त्यांना तुम्ही ३५ वर्षात काय केले? हे विचारण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला? अँड. चिमणभाऊ डांगे, दादासाहेब पाटील, अँड.धैर्यशिल पाटील, गजानन पाटील, उदय सरनोबत, सुशांत कुऱ्हाडे यांनीही मनोगत व्यक्त केले.

माजी नगराध्यक्ष सुभाषराव सुर्यवंशी, माजी नगरसेविका उषाताई बाणेकर, अनिल पावणे,गोपाळ नागे, प्रियांका साळुंखे,प्राचार्य दीपा देशपांडे, पिरअली पुणेकर, मालन वाकळे, राहुल नागे, रणजित तेवरे,संजय जाधव, रणजित गायकवाड, राजू सावकार, नाझीम खाटीक, सर्जेराव बोडरे, आयुब हवलदार,दत्ता फल्ले यांच्यासह त्या-त्या परिसरातील पदाधिकारी, कार्यकर्ते,युवक, महिला-पुरुष मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मतदान दिवस आणि मतदान पूर्व दिवस प्रिंट मिडीयामध्ये देण्यात येणाऱ्या राजकीय जाहिरातींचे पूर्व प्रमाणिकरण बंधनकारक

## जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी

**सातारा/प्रतिनिधी:** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक- २०२४ मतदानाच्या दिवशी (दि.२०.११.२०२४) आणि मतदानाच्या एक दिवस आधी (दि.१९.११.२०२४) प्रिंट मिडीयामध्ये कोणतीही राजकीय जाहिरात माध्यम पूर्व प्रमाणिकरण समितीकडून (चउचउ) पूर्व-प्रमाणित करणे अनिवार्य आहे. जोपर्यंत मतदान दिवस आणि मतदान पूर्व दिवस या दोन दिवसांमध्ये प्रिंट मीडियामध्ये देण्यात येणाऱ्या राजकीय जाहिराती माध्यम प्रमाणिकरण आणि सनियंत्रण कक्षाकडून प्रमाणित करून घेतल्या जात नाहीत तोपर्यंत वृत्तपत्रात प्रकाशित करुन नये, असे निर्देश जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले आहेत.




राजकीय पक्ष किंवा निवडणूक उमेदवार किंवा इतर कोणतीही संस्था किंवा व्यक्ती यांना उक्त कालावधीत प्रिंट मिडीयामध्ये राजकीय जाहिरात द्यावयाची झाल्यास, अर्जदारांनी सदर जाहिरात प्रकाशित करण्याच्या प्रस्तावित तारखेच्या २ (दोन) दिवस आधी चउचउ समितीकडे अर्ज करावा. मतदानाच्या दिवशी व मतदानाच्या एक दिवसपुर्वी प्रिंट माध्यमांमधून कोणत्याही भडकाऊ, दिशाभूल करणाऱ्या किंवा द्वेषपूर्ण जाहिरातींमुळे कोणतीही अप्रिय घटना घडू नये, ज्यामुळे निवडणूक प्रक्रियेला खीळ बसले अशा जाहिराती प्रकाशित होऊ नये, याबाबत दक्षता घेणेबाबत निर्देशही जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. डुडी यांनी दिल्या आहेत.

# सातारा जिल्ह्यात कार्तिकी एकादशी धार्मिक वातावरणात साजरी

**सातारा/प्रतिनिधी:** मराठी महिन्यातील आषाढी एकादशी पासून चार महिने चातुर्मास संपन्न होतो तो कार्तिकी एकादशी पर्यंत. आषाढ महिन्यातील एकादशीला देवशयनी अर्थात देवांची झोप सुरू होते म्हणून याला देवशयनी एकादशी म्हणतात तर चार महिने संपूर्ण चातुर्मास साजरा होताना कार्तिक महिन्यातील एकादशीला प्रबोधिनी एकादशी असे म्हटले जाते. हा चातुर्मास सांगता सोहळा कार्तिकी एकादशीला मोठ्या धार्मिक वातावरणात संपन्न होतो. अनेक वैष्णव भक्त हे उपवासाचे व्रत करून एकादशीचा सोहळा पूजा, हरिपाठ, भजन, अभंग गायन तसेच हरिनामाचा जागर करत साजरा करतात.

यावर्षी मंगळवारी संपन्न झालेल्या कार्तिकी एकादशीला सातारा शहरातील मंगळवार पेठ येथील श्री गवई विठ्ठल मंदिरातही पहाटेची काकड आरती झाल्यानंतर देवाला अतिशय सुरेख असे सोन्या-चांदीचे



सातारा शहरातील मंगळवार पेठेतील श्री गवई विठ्ठल मंदिरात विठ्ठल, रुक्मिणीची केलेली विशेष पूजा. फोटो ...अतुल देशपांडे सातारा

अलंकार घालून विविध फुलांच्या हारांनी मूर्तींना सजवण्यात आले होते. याकरिता गवळी परिवारातर्फे संतोष गवळी ,शैलेश गवळी आणि गवळी परिवारातील महिलावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. दिवसभर दर्शनासाठी भाविकांनी मंदिरात मोठी गर्दी केली होती. सायंकाळी महिला मंडळाचे भजन झाल्यावर रात्री आरती करण्यात आली, तसेच येणाऱ्या सर्व भक्तांना राजगिरा लाडू व केळाचा प्रसाद हातात वितरीत करण्यात आला.

यानिमित्त मंदिराला विद्युत रोषणाई करण्यात आली होती. सातारा शहरातील यादोगोपाळ पेठेतील श्री घाटगे विठ्ठल मंदिरातही सध्या कोजागिरी पौर्णिमेपासून त्रिपुरारी पौर्णिमेपर्यंत काकड आरती सुरू असून मंदिरात एकादशीनिमित्त विशेष पूजा करण्यात आली. सातारा शहरातील कमानी हौद परिसरातील श्री विठ्ठल - रुक्मिणी मंदिर तसेच संगम माहूली परिसरातील श्री राही, रखुमाई विठ्ठल मंदिर आणि जावली तालुक्यातील प्रति पंढरपूर समजल्या जाणाऱ्या करहर येथे विठ्ठल मंदिरात विशेष पूजा झाल्यावर भाविकांनी रांगा लावून विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेतले.

सातारा शहरातील श्री उत्तर चिदंबरम नटराज मंदिर परिसरातील राधाकृष्ण मंदिरात तसेच यादो गोपाळ पेठेतील दिवशीकर बंधूंच्या मुरलीधर मंदिरातही एकादशीनिमित्त विशेष पूजा तसेच फुलांचे आरास करण्यात आली होती. सातारा जिल्ह्यातील श्रीक्षेत्र गोंदावले तसेच श्री क्षेत्र सज्जनगड येथेही आषाढी एकादशी निमित्त भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती.

# उद्योग विभागांतर्गत सर्व आस्थापनांना २० नोव्हेंबरला मतदानासाठी सुट्टी

**कोल्हापूर/प्रतिनिधी:** निवडणूक- २०२४ साठी येत्या २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीमध्ये सर्व मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क योग्य रीतीने बजावता येण्यासाठी उद्योग विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापनांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाने सुट्टी जाहीर केली आहे.

भारत निवडणूक आयोगाने निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे राज्यातील सर्व विधानसभा मतदारसंघात विधानसभा सार्वत्रिक निवडणूक होत आहे. या निवडणुकीमध्ये सर्व मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क योग्य रितीने बजावता यावा यासाठी खालील प्रमाणे आदेश देण्यात आले आहेत.

निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार, अधिकारी, कर्मचारी यांना मग ते कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरीही त्यांना निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात यावी. ही सुट्टी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांतर्गत येणा-या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींना लागू राहील. (उदा. खासगी कंपन्या मधील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे, अन्य गृहे, नाट्यगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना तसेच माहिती व तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, मॉल्स, रिटेलर्स इ.) अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचारी इत्यादींना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर, मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी केवळ दोन ते तीन तासांची सवलत देता येईल. मात्र त्याबाबत त्यांनी संबंधित जिल्हा निवडणुक अधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील. कोणत्याही परिस्थितीत मतदारांना मतदानासाठी किमान दोन ते तीन तासांची भरपगारी सवलत मिळेल, याची दक्षता संबंधित आस्थापना मालकांनी घेणे आवश्यक राहील.

वर नमूद केल्यानुसार उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाअंतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींच्या मालकांनी, व्यवस्थापनाने या सूचनांचे योग्य ते अनुपालन होईल, याची काटेकोरपणे खबरदारी घ्यावी. मतदारांकडून मतदानाकरिता सुट्टी अथवा सवलत प्राप्त न झाल्याने मतदान करता येणे शक्य न झाल्याबाबत तक्रार आल्यास, त्यांच्याविरुध्द योग्य कारवाई करण्यात येईल.

# मानवी साखळीद्वारे फलटण येथे मतदार जनजागृती कार्यक्रम संपन्न

**सातारा/प्रतिनिधी: -** विधानसभा सार्वजनिक निवडणूक २०२४ अनुषंगाने २५५ फलटण (अ.जा) विधानसभा मतदारसंघांमध्ये स्वीप अंतर्गत मतदारांमध्ये मतदानाबाबत जनजागृती होण्यासाठी तसेच मतदानाचा टक्का वाढावा यासाठी १ हजार विध्यार्थी,युवक व मतदार यांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या नकाशामध्ये फलटण १०० % मतदान रांगोळी च्या व मानवी साखळी द्वारे करण्यात आले तसेच मानवी साखळी द्वारे जनजागृती चा कार्यक्रम संपन्न झाला

फलटण येथील यशवंतराव चव्हाण क्रीडा मैदानात झालेल्या कार्यक्रमास नोडल अधिकारी जिल्हा तथा मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अर्चना वाघमाळे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार फलटण डॉ. अभिजीत जाधव विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

मतदार व विद्यार्थ्यांची संवाद मुख्याधिकारी याशनी नागराजन म्हणाल्या, घरी आपल्या आई-बाबांना तसेच आपल्या परिसरात असणाऱ्या मतदार यांना मतदान हक्क बजावण्याबाब अहवान करून येत्या २० नोव्हेंबर २०२४ रोजी घरा बाहेर पडून मतदान करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार डॉ. अभिजित जाधव यांनी स्वीप अंतर्गत मतदान जनजागृती उपक्रम सुरु असल्याचे सांगून मतदार यांनी जागरूक होवून मतदान करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत आणि सुरुवात होऊन मतदान मतदान जनजागृती चे पथनाट्य सादर करण्यात आले व मतदार राजा जागा हो या लोकगीतातून गीत सादर करण्यात आले. तसेच उपस्थितांना मतदान करण्याचे शपथ देण्यात आली .

# लोकशाही बळकट करण्यासाठी सर्वांनी मतदान करावे

## सचिन खिलारी:वसंतरावदादा पाटील महाविद्यालयात नव मतदार संवाद मेळावा

**तासगाव/प्रतिनिधी:** भारताचा तिरंगा झेंडा पॅरिसमध्ये फडकविताना खूप अभिमान वाटला. आपल्या लोकशाहीला बळकट करण्यासाठी सर्वांनी मतदान करावे असे उद्गार पॅरा ऑलिम्पिक पदक विजेता आणि सांगली जिल्हा आयकॉन सचिन खिलारी यांनी पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील महाविद्यालय तासगाव येथे २८७ तासगाव कवठेमहांकाळ विधानसभा मतदारसंघातील नवीन मतदारांसाठी स्वीप अंतर्गत आयोजित केलेल्या नव मतदार संवाद मेळाव्यात बोलताना काढले. ते पुढे म्हणाले मी मतदान करणार आहे तुम्हीही मतदान करा. संविधानाने दिलेला अधिकार आणि हक्क सर्वांनी बजावण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.सर्वांनी मतदान जनजागृती करा,चांगला माणूस बना खेळातून चांगले करिअर करता येते ते सांगून मी कसा घडलो हे विद्यार्थ्यांसमोर कथन केले आणि विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करून प्रेरणा दिली.

यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी चंद्रकांत बोडरे यांनी भारतीय निवडणूक आयोगाने निवडणुकीसाठी केलेली तयारी सांगितली मतदानापासून कोणीही वंचित राहू नये यासाठी चे नियोजन सांगितले.गटविकास अधिकारी किशोर माने म्हणाले समाजाचा चांगला नागरिक बना आणि प्रत्येकाने मतदान करा असे सांगून विद्यार्थ्यांना मतदान करण्याचे आवाहन केले.या कार्यक्रमानिमित्त विद्यार्थ्यांना निःपक्षपाती पणे मतदान करण्याची शपथ दिली.

अध्यक्षस्थानावरून बोलताना प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे म्हणाले ध्येय समोर ठेवून यशाच्या शिखरापर्यंत आपण पोहोचू शकतो खेळातून करियर करण्याचे आवाहन त्यानी विद्यार्थ्यांना केले. लोकशाहीच्या उत्सवात सहभागी होऊन सर्वांनी स्वतःमतदान करावे आणि दुसऱ्याला मतदान करण्यासाठी प्रेरित करावे असे सांगितले. यावेळी २०० मीटर धावणे राज्यात द्वितीय आलेल्या व राष्ट्रीय स्पर्धेत निवड झालेल्या कु.अदिती सरवदे व क्रॉस कंट्रीत सहभाग घेतलेली कु.कमला चौधरी यांचा सत्कार सचिन खिलारी यांच्या हस्ते करण्यात आला.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वीप नोडल अधिकारी आबासाहेब लावंड यांनी केले तर आभार महाविद्यालयाचे नोडल अधिकारी डॉ.साईनाथ घोगरे यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. आण्णासाहेब बागल यांनी केले. कार्यक्रमाला स्वीप नोडल अधिकारी चंद्रकांत माळी, शिक्षण विस्तार अधिकारी रामचंद्र राठोड, सौ.शोभा जाधव,स्वीप पथक सदस्य दत्ता गळवे व प्रवीण कांबळे यांसह राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. तातोबा बदामे,एनसीसी चे कॅप्टन विनोदकुमार कुंभार, प्रभाकर पाटील डॉ.शहाजी पाटील, प्रा. पल्लवी मिरजकर, डॉ.नितीन गायकवाड, ज्युनिअर विभाग प्रमुख एस.डी.पाटील, प्रा. राजू काळभोर, डॉ.विलास साळुंखे,डॉ. दत्तात्रय थोरबोले यांसह महाविद्यालयातील प्राध्यापक विद्यार्थी- विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कराड दक्षिणच्या विकासासाठी ७४५ कोटींचा निधी आणला

**येळगाव/प्रतिनिधी:-**
गेल्या अडीच वर्षात महायुती सरकारच्या माध्यमातून कराड दक्षिणमध्ये ७४५ कोटींचा विकासनिधी आणला. केंद्रात मंत्री, राज्यात मुख्यमंत्री, खासदार, आमदार अशी सगळी पदे गेली अनेक वर्षे विद्यमान आमदारांनी भोगली. केंद्रात आणि राज्यात सत्तापदावर असताना त्यांनी या मतदारसंघाकडे ढुंकुनही बघितले नाही. मात्र आता निवडणुकीच्या तोंडावर आयटी हब, रोजगारासारखी खोटी आश्वासने देण्यात येत आहेत. असा हल्ला भाजपा - महायुतीचे उमेदवार डॉ.अतुलबाबा भोसले यांनी केला.

भाजपा - महायुतीचे कराड दक्षिणमधील उमेदवार डॉ. अतुलबाबा भोसले यांच्या प्रचारार्थ येळगाव (ता. कराड) येथे जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी व्यासपीठावर य. मो. कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे संचालक दयानंद पाटील, पैलवान आनंदराव मोहिते, पंकज पाटील, भूषण जगताप, संजय शेवाळे आदी मान्यवर प्रमुख उपस्थित होते.

यावेळी मतदारांशी संवाद साधताना डॉ. अतुलबाबा भोसले म्हणाले, की येळगाव भागात होत असलेल्या जाहीर सभेला मतदारांचा मिळत असलेला प्रतिसाद भारावून टाकणारा आहे. यात प्रामुख्याने येळगाव भागातील विविध गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर निधी आणण्यात आम्ही यशस्वी झालो. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, बांधकाम कामगार योजना, आयुष्यमान भारत, वयोश्री योजना, नमो शेतकरी योजना यासारख्या योजनांचा लाभ तळागाळातील लोकांना मिळावा, यासाठी मी विशेष प्रयत्न केले.



येळगाव येथील जाहिर सभेत बोलताना माहायुतीचे उमेदवार डॉ.अतुल भोसले.

येत्या काही दिवसात कृष्णा हॉस्पिटलची दुसरी शाखा शिरवळ सुरु होत आहे. तिथे मोठ्या प्रमाणात युवकांच्या हाताला रोजगार मिळणार आहे. तसेच कराडसाठी केंद्र सरकारच्या माध्यमातून मोठा उद्योग प्रकल्प येणार असून, त्या माध्यमातूनही मोठी रोजगार निर्मिती करण्याचे माझे ध्येय आहे. त्यामुळे मतदारांनी या मोठ्या मताधिक्याने मला विजयी करुन, लोकसेवेची संधी द्यावी, असे आवाहन डॉ. भोसले यांनी केले.

पैलवान आनंदराव मोहिते म्हणाले, आज अतुलबाबांच्या रुपाने भोसले कुटुंबाची तिसरी पिढी सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहे. कृष्णा हॉस्पिटल, कृष्णा विद्यापीठाच्या माध्यमातून आरोग्य व शिक्षणक्षेत्रात मोठे काम झाले आहे. त्यामुळे भोसले कुटुंबाने केलेल्या या कार्याची परतफेड म्हणून कराड दक्षिणमधील जनतेने डॉ. अतुलबाबांना आमदार करण्याचा निश्चय केला आहे. यावेळी बळीराजा शेतकरी संघटनेने डॉ. अतुलबाबांना जाहीर पाठिंबा दिला.

यावेळी मदनराव मोहिते, सुनील पाटील, प्रमोद मोहिते, अण्णासाहेब जाधव, राजू मुल्ला, विवेक पाटील, राजू पाटील, गणेश शेवाळे यांच्यासह कार्यकर्ते व मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.


कराड : संतभूमी संरक्षक संघर्ष समितीने जाहीर पाठिंबा दिल्यानंतर आ. पृथ्वीराज चव्हाण यांचा सत्कार करताना मधुसूदन पाटील, समवेत शिष्टमंडळ

# पृथ्वीराजबाबांनी मुख्यमंत्री असताना संतभूमीसाठी मोठे योगदान दिले

**कराड/प्रतिनिधी:-**
महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना संतभूमीसाठी फार मोठे योगदान दिले आहे. त्यामधील अत्यंत महत्वाचे कार्य म्हणजे श्री क्षेत्र देहू जवळील संत तुकोबारायांची ध्यान साधना तपोभूमी भंडारा भामचंद्र डोंगर हे राज्य संरक्षित स्मारक म्हणून सन २०११ला शासनाने घोषित केले. व त्यासाठी शासनाच्या सांस्कृतिक, पुरातत्व विभागाद्वारे अधिसूचनाही जारी केली. त्यामुळे या संपूर्ण पवित्र क्षेत्राला आज सुरक्षितता प्रदान झाली आहे. म्हणून आ. पृथ्वीराज चव्हाण यांना संतभूमी संरक्षक संघर्ष समितीने जाहीर पाठिंबा देण्यात येत आहे.

कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रीय काँग्रेस व महाविकास आघाडी मित्रपक्षाचे अधिकृत उमेदवार आ. पृथ्वीराज चव्हाण यांना संतभूमी संरक्षक संघर्ष समितीने जाहीर पाठिंबा दिला आहे. श्री क्षेत्र देहू येथील तपोभूमीतील या समितीचे संस्थापक तुकोबाभक्त मधुसूदन पाटील व त्यांच्या शिष्टमंडळाने आ. चव्हाण यांच्या निवासस्थानी भेट देवून आपला पाठिंबा जाहीर केला. यावेळी त्यांनी आ. चव्हाण व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. सत्वशीला चव्हाण (भाभी) यांचा वारकरी शाल, तुळशीचा हार घालून सत्कार करून समितीने आपली भूमिका जाहीर करत पाठिंबा दिला.

संतभूमी संरक्षक संघर्ष समितीने आ. चव्हाण यांना पाठिंब्याचे पत्र दिले. यामध्ये असे नमूद केले आहे की, आपण येथील वारकरी धर्माचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या संतभूमी संरक्षक संघर्ष समितीने सदर न्याय्य अधिसूचनांचे कायदेशीर पालन होण्यासाठी त्वरीत अद्यादेश काढावा, यासाठी सातत्याने पाठपुरावा व संघर्ष केला. परंतु आपलेनंतर कोणत्याच सरकारने संवेदनशीलपणे दखल घेतली नाही. त्यामुळे डाऊप्रमाणे पुन्हा वारकऱ्यांवर आंदोलनाची वेळ आली आहे.

आम्हा वारकऱ्यांस विश्वास वाटतो की, हे पवित्र काम आपणच पूर्ण करू शकाल. त्यासाठी आपणास मुख्यमंत्री म्हणून पुन:श्च भाग्य लाभावे व हे ऐतिहासिक कार्य पार पाडावे. यासाठी राज्यातील तमाम जनता जनार्दन, वारकरी, फडकरी दिंडीच्यावतीने शुभेच्छा, आशीर्वाद व जाहीर पाठिंबा दिला जात आहे.

# बस मधून सोन्याची माळ चोरणाऱ्या महिलेस अटक

**विटा/प्रतिनिधी:-**
सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील विटा बस स्थानकातून विटा येथून बसने शालीनी महादेव डोईजड ( वय वर्षे ८० ). ही वृद्धा महिला कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यातील ( वारण कोडोली) ही महिला गावी जात असताना शालिनी डोईजड जात असताना गर्दीचा फायदा घेत पिशवीतून कोणी अज्ञात चोरट्यांनी सोन्याची माळ हातोहात लंपास केली.

या संदर्भात विटा पोलीस ठाण्यात शालिनी डोईजड यांनी विटा पोलीस ठाण्यात धाव घेत या चोरी संदर्भात फिर्याद दाखल केली. या संदर्भात सांगली जिल्हा पोलिस अधीक्षक संदीप घुगे व अप्पर पोलीस अधीक्षक रितू खोखर मॅडम व विटा उपविभागिय पोलीस अधिकारी विपूल पाटील यांनी सदर विटा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय फडतरे यांना या संदर्भात तपासाच्या सुचना दिल्या होत्या. या सुचनेनुसार विटा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय फडतरे यांनी गुन्हे प्रकटीकरण पथकास या चोरीचा छडा लावण्याचा सुचना दिल्या या अनुषंगाने विटा पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अंमलदार संभाजी सोनवणे त्यांना त्यांच्या गोपनीय बातमीदार तर्फे माहिती मिळाली की .सदर विटा बस स्थानकातून बस मधून शालिनी डोईजड या वृद्धा महिलेच्या पिशवीतील चोरीस गेलेली सोन्याची माळी चोरणारी महिला ती विटा शहरातील एका सराफ व्यावसायिकाकडे विक्रीस आली आहे असे विटा पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकास मिळाली या अनुषंगाने विटा पोलीस पथकाने सापळा रचून सदर त्या महिलेला पथकाने ताब्यात घेतले . तिच्याकडे या पथकाने कसून चौकशी केली असता विटा बस स्थानकातील बस मध्ये चोरी केल्याची कबूली महिले दिले तिचे नाव उषा अशोक सांगळे ( वय वर्षे ३८ ) राहणार सोनारी तालुका परांडा जिल्हा उस्मानाबाद असे या महिलेने नाव सांगितले. त्या महिलेकडून १लाख ५० हजारांची सोन्याची माळ जप्त करण्यात आली.

ही कामगिरी गुन्हे प्रकटीकरण पथकातील अंमलदार उत्तम माळी. संभाजी सोनवणे. महिला पोलीस सोनम सोरटे .अमोल कराळे. महेश देशमुख.अक्षय जगदाळे. हेमंत ताबेवाघ . महेश संकपाळ. करण परदेशी. पोलीस हेडकॉन्स्टेबल विवेक साळुंखे. कॅप्टन गुंडवाडे . या टीमने ही दमदार कामगिरी केली.



## संभाजीनगर येथून दुचाकीची चोरी

**सातारा/प्रतिनिधी:-**
संभाजीनगर येथून अज्ञात चोरट्याने दुचाकीची चोरी केल्याची फिर्याद सातारा शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १० रोजी सकाळी नऊ वाजता अक्षय सुभाष मगर रा. संभाजीनगर, सातारा यांची घरासमोर पार्क केलेली दुचाकी चोरट्याने चोरून नेली आहे.

# कळंत्रेवाडीत महायुतीच्या बॅनरची अज्ञातांकडून मोडतोड

**चाफळ/प्रतिनिधी:-**
कळंत्रेवाडी,ता.कराड येथील रहिवासी तसेच भाजपचे कार्यकर्ते राजेंद्र थोरात यांच्या राहत्या घराजवळील स्वमालकीच्या जागेमध्ये पाटण पंढरपूर राज्यमार्गालगत ग्रामपंचायतची रीतसर परवानगी घेऊन महायुतीचे कराड उत्तरचे अधिकृत उमेदवार श्री मनोज भिमराव घोरपडे यांच्या प्रचारार्थ लावण्यात आलेल्या बॅनरची सोमवार दिनांक ११ नोव्हेंबर रोजी मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञातांनी मोडतोड केल्याची दुर्दैवी घटना घडली. त्यामुळे गावामध्ये उलट सुलट चर्चांना उधाण आले. असून वातावरणात तणावपूर्ण शांतता आहे. याबाबत घटनास्थळावरून मिळालेल्या अधिक माहितीनुसार, येथील रहिवासी तसेच भाजपचे कार्यकर्ते राजेंद्र थोरात यांच्या स्वमालकीच्या जागेत महायुतीचे उमेदवार मनोज भिमराव घोरपडे यांच्या प्रचारार्थ बॅनर लावण्यात आला होता. दरम्यान, सोमवार दिनांक ११ नोव्हेंबर रोजी मध्यरात्रीच्या सुमारास रात्रपाळीने पाणी पाजण्यासाठी शेतात जाणाऱ्या शेतकऱ्यांना सदर बॅनरची मोडतोड झाल्याचे निदर्शनास आले. दरम्यान,शेतकऱ्यांनी सदर घटनेची माहिती स्थानिक महायुतीच्या कार्यकर्त्यांना दिल्यानंतर त्या जागेवरून बॅनर हटवण्यात आला असून सदरची घटना अत्यंत निंदनीय व दुर्दैवी असल्याच्या प्रतिक्रिया यावेळी महायुतीच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या.




# विटा तडसर रोडवर पकडला विषारी पांढऱ्या रंगाचा साप

**विटा/प्रतिनिधी:-**
सागली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील विटा तडसर रोडवर चक्क पांढऱ्या रंगाचा साप एका शेतकऱ्याच्या नजरेत आला आणि तो साप एक सर्प मित्राने पकडून सुरक्षित ठिकाणी सोडला . मात्र हा रंगीबेरंगी सर्प पाढऱ्या रंगाचा पकडल्यावर नागरिकांनी हा सर्प पहाण्यासाठी विटा तडसर वांगी परिसरात गर्दी केली होती. कोणी म्हणी दैव शक्ती असावी कोणी म्हणावे देवाचा वासा असेल अशी महिला व नागरीकातून चर्चा होत होती ही घटना शेतकरी व नागरीकातून चांगलीच रंगली होती .मात्र कोणतीही इजा या सर्पाला न होतो सुरक्षित मात्र जंगलवनात सोडण्यात आले.






# कराडमधील शिवाजी स्टेडियमवर स्वीप पथकाचा भव्यदिव्य कार्यक्रम साकारला महाराष्ट्राचा नकाशा

**कराड/प्रतिनिधी:-**
विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कराड येथील छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियमवर तब्बल ३० हजार स्केअर फुटावर विविध विद्यालयांच्या सुमारे २००० विद्यार्थ्यांच्या मानवी साखळीतून महाराष्ट्राचा नकाशा साकारून मतदान जागृती करण्यात आली. मतदानाचा टक्का वाढावा व सर्वांनी मतदान करावे या उद्दिष्टाने कराड उत्तर व कराड दक्षिण स्वीप पथकाच्या माध्यमातून व कराड दक्षिणचे निवडणूक निर्णय अधिकारी अतुल म्हेत्रे, व कराड उत्तरचे निवडणूक निर्णय अधिकारी विक्रांत चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली हा भव्य दिव्य उपक्रम राबवण्यात आला.

यावेळी कराड दक्षिण च्या सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी स्मिता पवार, आचारसंहिता सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा गटविकास अधिकारी प्रताप पाटील, मलकापूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी प्रताप कोळी, शिक्षणाधिकारी शबनम मुजावर, गटशिक्षणाधिकारी बिपीन मोरे, नायब तहसीलदार युवराज पाटील, शिक्षण विस्तार अधिकारी नितीन जगताप यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी कराड शहरातील १० विद्यालयांमधील तब्बल २००० विद्यार्थ्यांच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियमवर ३० हजार स्केअर फुटावर महाराष्ट्राचा नकाशा साकारून मानवी साखळीच्या माध्यमातून मतदान जनजागृती करण्यात आली. यावेळी कराड दक्षिणच्या सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी स्मिता पवार, शिक्षणाधिकारी शबनम मुजावर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.. शिवाजी स्टेडियम वर तब्बल ३०००० स्केअर फुटावर अवघ्या दोन तासात महाराष्ट्राचा नकाशा साकारून कला शिक्षकांनी आपल्या कलेचे बहारदार प्रदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेंद्र भोसले, सुनील परीट यांनी केले. आनंदराव जानुगडे यांनी प्रतिज्ञा वाचन केले. सदरचा उपक्रम यशस्वी करण्यासाठी स्वीप पथकाचे नोडल अधिकारी सौरभ करपे, प्रतिभा लोंढे, सहाय्यक नोडल अधिकारी सुनील परीट, महेंद्र भोसले, तसेच पथकातील कर्मचारी आनंदराव जानुगडे, ऋषिकेश पोटे, संतोष डांगे, गोविंद पवार, अनिल काटकर, प्रदीप बंडगर, मिडीया पथकाचे दिलीप माने, जुबेर बोरगावकर, कुंभार मॅडम तसेच तालुक्यातील कला शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# कराड उत्तरमधील बदलाच्या प्रवाहात सामिल व्हावे:घोरपडे

**उंब्रज/प्रतिनिधी:-**
पंचवीस वर्षात ज्यांनी काहीच केलं नाही त्यांना आणखीन दहा दिली तरी काहीच फरक पडणार नाही. सध्या लोकांनीच ही निवडणूक हातात घेतली आहे. बदलाच्या प्रवाहात सर्वांना बरोबर घ्या असे आवाहन भाजप महायुतीचे उमेदवार मनोजदादा घोरपडे यांनी केले.

चोरे ता. कराड येथे मनोजदादा घोरपडे यांच्या प्रचार रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी झालेल्या कोपरा सभेत चोरे विभागाच्या पाणी प्रश्नावर त्यांनी लक्ष केंद्रित केले. यावेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष सुरेशतात्या पाटील, भैय्यासाहेब साळुंखे, निखील साळुंखे पाटील, धैर्यशील साळुंखे पाटील, संजय गोळे, संजय साळुंखे, भांबे संदीप काटे, महेश काटे, शरद भोसले, अक्षय यादव, मुकुंद गोळे, जालिंदर रामुगडे, विजय चव्हाण, अगंद साळुंखे, विकास साळुंखे, दिपक साळुंखे, बबन यादव, राजेंद्र साळुंखे, नरेंद्र यादव, नारायण कुलकर्णी, जयंत कुलकर्णी, दिगंबर भिसे पाटील, वडगावचे माजी सरपंच रणजित कदम, जयवंत जाधव,

मनोजदादा घोरपडे म्हणाले,चोरे विभागातील इंच न इंच क्षेत्र पाण्याखाली आणण्याचे स्वप्न लोकनेते बाबासाहेब चोरेकरांनी पाहीले होते. परंतु इथल्या विद्यमान आमदारांना ते जमले नाही. मग कशासाठी त्यांना मते द्यायची. जाणिव पुर्वक चोरेकरांचा भाग त्यांनी विकासा पासून वंचित ठेवला. परंतु आता वेळ बदलली आहे. उप उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या भागाच्या सिंचनाचा प्रश्न सोडवण्याचा शब्द दिला आहे. भाजप महायुतीच आपल्या भागाला पाणी देवून दुष्काळ मुक्त करणार असे आश्वासन यांनी दिले.

मनोजदादा म्हणाले, चोरे विभाग पाण्यापासून तहानलेला आहे. पाणी संघर्ष समितीचे आम्ही पाठीशी आहोत. आपला प्रस्ताव मंत्रालयात आहे. परवाच शुभारंभाचा नारळ उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाल येथे फोडला त्यावेळी त्यांनी ५० मीटरचे हेड १०० पर्यंत हेड पर्यंत नेण्याचा शब्द दिला आहे. उपमुख्यमंत्री फडणवीस यांचा शब्द म्हणजे शिरोधारी असून दोन कॅबिनेटच्या बैठकीतच हा प्रश्न मार्गी लावू इतर विकासांनाही महायुती कधीही कमी पडणार नाही. गेल्या २५ वर्षाचा विकासाचा अनुशेष आपण भरून काढू तसेच एम टँक क्षेत्रातील जमीन गेलेल्या शेतकऱ्यांना भरपाई देण्याचा प्रश्न मार्गी लावला आहे. या परिसरातील सिंचनाचा प्रश्न सुटला तर या परिसराचे नंदनवन होणार आहे. महायुतीच्या दिशेने आपण गेलो तर पाणी आहे तर महाविकास आघाडीच्या दिशेने गेलो तर आपल्या माथी पुन्हा दुष्काळ असल्याचे ते म्हणाले.



भैय्यासाहेब साळुंखे म्हणाले, मनोजदादा घोरपडे हे गतिमान क्रियाशील नेतृत्व आहे. कराड उत्तरचा आश्वासक चेहरा म्हणून या नेतृत्वाला पसंती मिळत आहे. चोरे विभागातून मनोज दादांना मोठ्या प्रमाणावर मताधिक्य येथील जनता देणार आहे. संजय साळुंखे म्हणाले, मनोजदादा घोरपडे यांनी गेल्या बारा वर्षांपासून चोरी विभागाशी संपर्क ठेवला आहे. लोकांचे विविध प्रश्न सोडवले असून महिलांचे संघटन उभे केले आहे. यावेळी सर्व जनता मनोज दादा घोरपडे यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. मनोजदादाच कराड उत्तरचे आमदार होतील असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. दरम्यान गावभेट दौऱ्यानिमित खोडद, हरपळवाडी, भगतवाडी, मरळी, डफळवाडी, चोरजवाडी, मस्करवाडी, साखरवाडी, जंगलवाडी, धावरवाडी, सावरघर या गावांमध्ये मनोजदादांना घोरपडे यांच्या प्रचार रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ठिकठिकाणी ग्रामस्थ स्वागतासाठी उभे असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

चौकट : प्रचारादरम्यान मनोजदादा घोरपडे यांनी लोकनेते बाबासाहेब चोरेकर यांच्या स्मारकाचे दर्शन घेतले. तसेच चोरेकर कुटुंबाच्या निवासस्थानी भेट देवून चर्चा केली. पाल जिल्हा परिषद गट, चोरे विभाग विकासाचे रोल मॉडेल करु असे मनोजदादा घोरपडे यांनी सांगितले. यावेळी बाळासाहेब चोरेकर यांनी मनोजदादांना शुभेच्छा देवून जनता तुमच्या पाठीशी असल्याचे सांगितले.

# महायुतीच्या भूलथापांना जनतेने बळी पडू नये

## ॲड.संपा घोष यांचे साताऱ्यात आवाहन

**सातारा/प्रतिनिधी:-**
महायुती शासनाकडून निवडणुकीच्या काळात लाडक्या बहिणींना मोबदला देत मते मागण्याचे काम सुरू आहे. ही जनतेची फसवेगिरी आहे. जनतेने महायुतीच्या भूलथापांना बळी पडू नये, असे आवाहन अखिल भारतीय काँग्रेसच्या महिला विधानसभा निरीक्षक ॲड.संपा घोष यांनी यांनी केले.

सातारा येथे जिल्हा काँग्रेस कमिटीत आयोजित पत्रकार परिषदेत ॲड. घोष बोलत होत्या. यावेळी जिल्हाध्यक्षा अल्पना यादव, रजनी पवार, रजिया शेख, अरुणा नाझरे, मालन परळकर यांच्यासह महिला पदाधिकारी उपस्थित होत्या. दरम्यान, जिल्हा काँग्रेस कमिटीत महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी ॲड. घोष आल्या होत्या.

जिल्हाध्यक्षा अल्पना यादव म्हणाल्या, भाजपचे खासदार धनंजय महाडिक यांनी काही दिवसांपूर्वी महिलांबाबत चुकीचे वक्तव्य केले होते. याचा महिला काँग्रेसच्यावतीने निषेध आहे. काँग्रेस पक्ष महिलांच्याबाबत कोठेही कमी पडत नाही. विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसने आपल्या पंचसूत्रीत विविध आश्वासने दिली आहेत. त्याची पूर्तता करण्यात येईल.

## अपघातात जखमी केल्याप्रकरणी दुचाकी चालकावर गुन्हा

**सातारा/प्रतिनिधी:-**
अपघातात एका महिलेस जखमी केल्याप्रकरणी दुचाकी चालकाविरुद्ध सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. ९ रोजी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास श्रीमती वनिता लहू घाडगे रा. देगाव पाटेश्वर, ता. सातारा या पाटेश्वर ते बस स्टॉप जाणाऱ्या रस्त्यावर पायी चालत जात असताना संजय विलास साळुंखे रा. देगाव, ता. सातारा याने त्याच्या ताब्यातील मोटरसायकल क्र. एमएच ११ टीसी ८२ ने घाडगे यांना जोरदार धडक दिली. या अपघातात त्या जखमी झाल्या आहेत. अधिक तपास पोलीस नाईक व्ही. व्ही. मोरे करीत आहेत.

# आबांच्या प्रचाराला धावला भाऊ कदम

**पांचगणी/प्रतिनिधी:-**
आ. मकरंद आबा पाटील यांना तुम्ही जनतेने जननायक ही दिलेली पदवी त्यांच्या कामामुळे दिली आहे. हे मला तुमच्या प्रचंड प्रतिसादावरून दिसत आहे. सदैव जनतेसाठी काम करणारे आबा यांनी गतवर्षी हॅटट्रिक केली आता ते विजयाचा चौकार नक्कीच मारतील असा विश्वास चला हवा येऊ द्या फेम प्रसिद्ध कलाकार आणि राष्ट्रवादीचे स्टार प्रचारक भाऊ कदम यांनी व्यक्त केला.

विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराला आता जोर आला आहे. वाई - खंडाळा - महाबळेश्वर मतदार संघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार आ. मकरंद आबा पाटील यांच्या प्रचारासाठी स्टार प्रचारक भाऊ कदम हे खिंगर (तालुका. महाबळेश्वर ) येथे आले होते. यावेळी ते मतदारांशी संवाद साधत होते. यावेळी खासदार नितीन काका पाटील, जिल्हा बँकेचे संचालक राजेंद्र शेठ राजपुरे, जावळी बँकेचे चेअरमन विक्रम भिलारे , संचालक अजित कळंबे, प्रवीण शेठ भिलारे, सहकार बोर्डाचे अध्यक्ष महादेव दुधाने, राजेंद्र भिलारे, अशोक दुधाने, रमेश चोरमले, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष तानाजी भिलारे, संतोष कवी, विठ्ठल दुधाने, जनार्दन कळंबे, अंकुश मालुसरे तसेच गावोगावचे सरपंच , सदस्य व मतदार उपस्थित होते.

भाऊ कदम पुढे म्हणाले मकरंद आबा पाटील आणि अजितदादा पवार यांच्यासारखी माणस शाहू फुले आंबेडकरांच्या विचाराने वाटचाल करीत आहेत. सकाळी सहा वाजता उठतात ,रात्री दीड वाजता झोपतात आणि पुन्हा सकाळी सहा वाजता उठतात. सकाळी पुन्हा अगदी फ्रेश. ती स्वत:साठी काही करत नाहीत तर तुम्हा आम्हा सर्वांसाठी रात्रंदिवस झटत आहेत. खरंच ही मोठी माणस आहेत त्यांना तुम्ही पुन्हा विधानसभेत पाठवा.

यावेळी बोलताना खासदार नितीन काका पाटील म्हणाले मकरंद आबा पाटील हे तुमच्या मनातले आमदार आहेत. त्यामुळे यावेळी जास्तीत जास्त मताधिक्य तुम्ही महाबळेश्वरकर नागरिक आबांना विजयी करतील याची मी खात्री बाळगतो.

यावेळी राजेंद्र शेठ राजपुरे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. प्रमोद पवार यांनी सूत्रसंचालन केले तर अशोक दुधाने यांनी आभार मानले.


खिंगर : मतदारांना मार्गदर्शन करताना भाऊ कदम शेजारी राजेंद्र शेठ राजपुरे व इतर

## सातारा शहरातील दोन दारु अड्ड्यांवर छापे

**सातारा/प्रतिनिधी:-**
सातारा शहरातील दोन दारु अड्ड्यांवर छापे टाकून पोलिसांनी दोघांवर कारवाई केली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. ११ रोजी सातारा शहरातील चिपळूणकर बाग येथील पत्र्याच्या शेडच्या आडोशास दारू विक्री करताना सोमनाथ शत्रुघ्न गायकवाड रा. सदर बाजार, सातारा हे आढळून आले. त्यांच्याकडून ९८० रुपये किमतीचे देशी दारूच्या बाटल्या हस्तगत करण्यात आल्या आहेत.

दुसऱ्या घटनेत कासट मार्केट ते तहसील कार्यालय रस्त्यावरील नगरपालिकेचे गाळ्याशेजारील आडोशाला प्रशांत मोतीलाल कलाल रा. सदर बाजार, सातारा हे दारू विक्री करताना आढळून आले. त्यांच्याकडून १३ हजार ४४० रुपये किंमतीच्या देशी दारूच्या बाटल्या हस्तगत करण्यात आल्या आहेत.